| Sr. No. | Date | Subject |
|---|---|---|
| १ | दि.२०.०२.८० | अंध व अस्थिव्यंगामुळे अधू शासकीय कर्मचाऱ्यांना विशेष वाहन भत्ता मंजूर |
| २ | दि.२९.०६.८१ | विशेष वाहन भत्ता कधीपासून द्यावयाचा तो दिनांक |
| ३ | दि.२०.०९.८२ | अपंगत्वाचे प्रमाणपत्र मिळविण्यासाठी आलेला प्रवास खर्च मिळण्याबाबत |
| ४ | दि.०४.०१.८४ | अंध व अस्थिव्यंगामुळे अधू शासकीय कर्मचाऱ्यांना विशेष वाहन भत्त्याची मर्यादा वाढविणे |
| ५ | दि.१०.०१.८४ | अंधत्वाची व्याख्या (दोन्ही डोळयांची दृष्टी ३/६० पेक्षा कमी अथवा क्षेत्रदृष्टी १० अंशापेक्षा कमी) |
| ६ | दि.०८.०३.८९ | चौथ्या वेतन आयोगानुसार अपंगांसाठी विशेष वाहन भत्त्याची मर्यादा वाढविली |
| ७ | दि.२०.०४.९० | Hunch Back disability असलेल्या कर्मचाऱ्यांना विशेष वाहन भत्ता लागू |
| ८ | दि.१४.१२.९८ | शासकीय कर्मचाऱ्यांना वाहतूक भत्ता लागू केला / अपंग कर्मचाऱ्यांचा विशेष वाहन भत्ता बंद त्याऐवजी दुप्पट वाहतूक भत्ता |
| ९ | दि.०६.०१.९९ | वरील १४.१२.९८ मधील परिच्छेद ८ सुधारीत केला |
| १० | दि.०७.०९.९९ | ०१.०८.९७ ते ३०.०९.९८ पर्यंतची वाहतूक भत्त्याची थकबाकी देण्याबाबत कारण आता वाहतूक भत्ता दि.०१.०८.९७ पासून लागू |
| ११ | दि.०४.०६.०१ | अपंग कर्मचाऱ्यांना वाहतूक भत्ता देण्याबाबतच्या आदेशांचे एकत्रिकरण |
| १२ | दि.०९.०५.०३ | वाहतूक भत्ता प्रदान करण्याबाबत स्पष्टीकरण |
| १३ | दि.०२.०८.०४ | अंध व अस्थिव्यंगामुळे अधू शासकीय आणि कण्याच्या विकाराने पिडीत कर्मचाऱ्यांना वाहतूक भत्ता (कर्तव्यस्थानापासून एक किलोमीटर अंतराच्या आत राहणाऱ्या कर्मचाऱ्यांसाठी) |
| १४ | दि.२१.०५.०५ | नियम (सुधारणा) – सेवा निवृत्त / सेवा समाप्त कर्मचाऱ्यांना न्यायालय / विभागीय चौकशीसाठी वाहतूक भत्ता |
| १५ | दि.१३.०५.०९ | ६ व्या वेतन आयोगानुसार वाहतूक भत्ता न देता कर्मचाऱ्यांची असुधारीत वेतनश्रेणी व या भत्त्याचे सध्या (तेव्हा) लागू असलेल्या दराप्रमाणे |
| १६ | दि.०५.०४.१० | ०१.०४.२०१० पासून सुधारीत वाहतूक भत्ता (दर वाढविले) |
| १७ | दि.०७.०९.११ | अपंग कर्मचाऱ्यांना किमान रु.१०००/-वाहतूक भत्ता |
| १८ | दि.०३.०६.१४ | दि. ०५.०४.२०१० च्या शा.नि. च्या वाहतूक भत्त्याच्या दरात सुधारणा |
| १९ | दि.०४.०६.१४ | वरील ०३.०६.२०१४ च्या शा.नि. बाबत शुद्धीपत्र |

!A001

A00121 ...524001

अंध आणि अस्थी व्यंगामुळे अपू असलेल्या शासकीय कर्मचाऱ्यांना विशेष वाहन भत्ता मंजूर करणे.

महाराष्ट्र शासन
वित्त विभाग
शासन निर्णय क्रमांक टोआरए १३७९/सोआर १०२७/एसईआर-५
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२, दिनांक २० फेब्रुवारी १९८०.

शासन निर्णय

ज्या शासकीय कर्मचाऱ्यांना कामाच्या ठिकाणी जाण्यास अथवा ठिकाणाहून परत येण्यास सर्वसाधारणपणे शारीरिक मदतीची आवश्यकता असते अशा अंध शासकीय कर्मचाऱ्यांना आणि हातापायांच्या विकलांगतेसहित अस्थी व्यंगामुळे अपू असलेल्या शासकीय कर्मचाऱ्यांना काही सहाय्य मंजूर करण्याचा प्रश्न शासनाच्या विचाराधीन होता. शासन आता असा निर्णय देते की, (कार्यव्ययी कर्मचाऱ्यांसहित) नियमित आस्थापनांवर असलेल्या उपरोक्त प्रकारच्या अंध आणि हातापायाच्या विकलांगतेसहित अस्थीव्यंगामुळे अपू असलेल्या शासकीय कर्मचाऱ्यांना त्यांच्या मूळ वेतनाच्या १० टक्के अथवा कमाल ५० रुपये प्रती माह एवढा विशेष वाहन भत्ता, खालील अटी पूर्ण होत असल्यास मंजूर करण्यात यावा.

(१) अस्थी व्यंगामुळे अपू असलेल्या शासकीय कर्मचाऱ्याला (पुरुष अथवा महिला) जर वरच्या अथवा खालच्या अवयवाची किमान ४० टक्के कायम स्वरूपाची आंशिक विकलांगता आहे किंवा वरच्या आणि खालच्या अवयवांची मिळून किमान ५० टक्के कायम स्वरूपाची आंशिक विकलांगता आहे, फक्त असेच शासकीय कर्मचारी उक्त विशेष वाहन भत्त्यासाठी पात्र असतील. शारीरिक अपंगतेच्या अंदाजासाठी, अमेरिकेतील अस्थीव्यंग शल्यचिकित्सकांसाठी अमेरिकन अॅकॅडेमी ऑफ ऑर्थोपेडिक सर्जन्स या संस्थेने कायमची शारीरिक अपंगता शोधून काढण्यासाठी तयार केलेल्या आणि सदर संस्थेच्या वतीने आर्टिफिशल लीम्ब्स् मॅन्युफॅक्चरिंग कॉर्पोरेशन ऑफ इंडिया, जी.टी.रोड, कानपूर यांनी प्रकाशित केलेल्या नियमावलीत ग्रथित केलेल्या मानकांचा अवलंब/वापर करण्यात यावा.

(२) अस्थीव्यंगामुळे अपू असलेल्या शासकीय कर्मचाऱ्यांना शासकीय रुग्णालयाच्या अस्थीव्यंगोपचार विभाग प्रमुखांच्या शिफारशीनंतरच, फक्त, विशेष वाहन भत्ता अनुज्ञेय होईल.

(३) अंध कर्मचाऱ्यांच्या बाबतीत सुध्दा शासकीय रुग्णालयाच्या नेत्रोपचार विभाग प्रमुखाच्या शिफारशीनंतरच, फक्त, विशेष वाहन भत्ता अनुज्ञेय होईल.

(४) सदर भत्ता (नैमित्तिक रजे व्यतिरिक्त) रजा, पदग्रहण अवधी, निलंबन या कालावधीत अनुज्ञेय असणार नाही.

२. या आदेशानुसार विशेष वाहन भत्ता मंजूर करण्यास सर्व विभाग प्रमुखांना शासन प्राधिकृत करीत आहे. तदनुसार संबंधित शासकीय कर्मचाऱ्यांनी विशेष वाहन भत्ता मंजूर करण्यासाठी त्यांच्या विभाग प्रमुखांकडे अर्ज करावेत. विशेष वाहन भत्ता मंजूर करण्यासाठी योग्य त्या वैद्यकीय अधिकाऱ्याची शिफारस मिळविण्यासाठी संबंधित शासकीय कर्मचाऱ्यांची प्रकरणे सदर वैद्यकीय अधिकाऱ्यांकडे संदर्भित

करण्याची जबाबदारी विभाग प्रमुखावर राहील. विभाग प्रमुखांनी, संबंधित वैद्यकीय अधिकाऱ्यांची शिफारस ज्या तारखेपासून प्राप्त होईल, त्या तारखेपासून उक्त वाहन भत्ता मंजूर करावा. तथापि विद्यमान कर्मचाऱ्यांच्या बाबतीत उक्त विशेष वाहन भत्ता दिनांक १ जानेवारी १९८० पासून मंजूर करण्यात यावा. विशेष वाहन भत्ता संबंधित कर्मचाऱ्यांच्या मासिक वेतनासमवेतच देण्यात यावा.

३. या संदर्भात असाही निर्णय घेण्यात आला आहे की, ज्या प्रकरणी उपरोक्त अपंग कर्मचाऱ्यांना संबंधित विभाग प्रमुखांकडून वाहन भत्ता मंजूर करण्यासाठी वैद्यकीय शिफारस मिळविण्याकरिता त्यांच्या मुख्यालयाच्या बाहेरील ठिकाणी असलेल्या शासकीय रुग्णालयाकडे पाठविण्यात आले असेल अशा प्रकरणी सदर कर्मचाऱ्यांना त्यांच्या प्रत्यक्ष प्रवास भत्ता खर्चाएवढ्या रकमेची प्रतिपूर्ती करण्यात यावी. सदर रक्कम प्रवास आणि मुक्काम यांच्या कालावधीतील दैनिक भत्त्या व्यतिरिक्त दौऱ्यावरील प्रवासात अनुज्ञेय असलेल्या प्रवास भत्त्या एवढी कमाल रक्कम असेल, तथापि प्रवासामध्ये तसेच रुग्णालयामध्ये घालवावा लागणारा कालावधी कामाचा कालावधी म्हणून समजण्यात यावा.

४. ह्या आदेशाची इंग्रजी प्रत सोबत जोडली आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

श्रीमती एस. व्ही. पंडित,
शासनाचे उप सचिव, वित्त विभाग.

प्रति

(१) महालेखापाल, महाराष्ट्र १, मुंबई,
(२) महालेखापाल, महाराष्ट्र २, नागपूर,
(३) अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई (महाराष्ट्र राज्य),
(४) मुख्य लेखा परीक्षक, स्थानिक निधी लेखा, महाराष्ट्र राज्य, मुंबई,
(५) राज्यपालांचे सचिव,
(६) मुख्य मंत्र्यांचे सचिव,
(७) सर्व मंत्र्यांचे व राज्य मंत्र्यांचे स्वीय सहाय्यक,
*(८) प्रबंधक, मूळ न्याय शाखा, उच्च न्यायालय, मुंबई,
*(९) प्रबंधक, अपील शाखा, उच्च न्यायालय, मुंबई,
*(१०) सचिव, महाराष्ट्र लोकसेवा आयोग, मुंबई,
*(११) प्रबंधक, लोक आयुक्त व उप लोक आयुक्त यांचे कार्यालय, मुंबई,
*(१२) वरिष्ठ उप संचालक, वाणिज्य लेखा परीक्षा, शासकीय वाहतूक लेखा परीक्षा मंडळ, मुंबई,
(१३) विशेष आयुक्त, महाराष्ट्र सदन, कोपर्निकस रोड, नवी दिल्ली,
(१४) मंत्रालयाचे सर्व विभाग,
(१५) मंत्रालयाच्या निरनिराळ्या विभागांच्या अधीन असलेल्या सर्व विभागांचे व कार्यालयांचे प्रमुख,
(१६) सर्व जिल्हाधिकारी,
(१७) सर्व विभागीय आयुक्त,
(१८) सर्व जिल्हा परिषदांचे मुख्य कार्यकारी अधिकारी,
(१९) सर्व जिल्हा परिषदांचे मुख्य लेखा व वित्तीय अधिकारी,
(२०) संपर्क अधिकारी, मंत्रालय, मुंबई,
(२१) वित्त विभागातील सर्व कार्यासने,
(२२) निवड नस्ती, कार्यासन एसईआर-५, वित्त विभाग,
*(२३) सचिव, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, मुंबई.

*पत्राद्वारे:

क्रमांक दिनांक

यांच्या माहितीसाठी व मार्गदर्शनासाठी प्रत पाठविण्यात आली आहे.

तातडीचे

अंध आणि अस्थि-व्यंगामुळे अपंग असलेल्या शासकीय कर्मचाऱ्यांना विशेष वाहन भत्ता मंजूर करण्याबाबत.

महाराष्ट्र शासन
वित्त विभाग,
शासन परिपत्रक क्रमांक-टिआरए-१३८१/सीआर-४४४/एसईआर-५,
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२, दिनांक २९ जून १९८१.

परिपत्रक

शासन निर्णय, वित्त विभाग क्रमांक टीआरए-१३७९/सीआर-१७३७/एसईआर-५, दिनांक २० फेब्रुवारी १९८० च्या परिच्छेद-२ मधील तरतुदीनुसार अंध आणि अस्थिव्यंगामुळे अपंग असलेल्या शासकीय कर्मचाऱ्यांनी विशेष वाहन भत्ता मिळण्यासाठी आपल्या विभाग प्रमुखाकडे अर्ज करावयास पाहिजे. विभाग प्रमुखांनी अशा प्रकारच्या प्रकरणांवर योग्य त्या वैद्यकीय अधिकाऱ्यांची शिफारस प्राप्त केल्यानंतर सदर शिफारस मिळालेल्या तारखेपासून, तथापि विद्यमान कर्मचाऱ्यांच्या बाबतीत दिनांक १ जानेवारी १९८० पासून उक्त विशेष वाहन भत्त्यास मंजुरी द्यावी असे शासनाचे आदेश दिले आहेत.

२. अंध किंवा अस्थिव्यंगामुळे अपंग असलेल्या शासकीय कर्मचाऱ्यांच्या विशेष वाहन भत्ता प्रकरणी वैद्यकीय अधिकाऱ्यांकडून विभाग प्रमुखांना तशा प्रकारची शिफारस प्राप्त होण्यास विलंब होण्याची शक्यता आहे. ही शक्यता लक्षात घेऊन शासन असे स्पष्ट करते की, दिनांक १ जानेवारी १९८० नंतर शासकीय सेवेत नोकरीस लागलेल्या अंध व अस्थिव्यंगामुळे अपंग कर्मचाऱ्यांच्या बाबतीत संबंधित वैद्यकीय अधिकाऱ्यांनी आपल्या शिफारस पत्रात ज्या तारखेपासून अशा कर्मचाऱ्यांस अंधत्व वा अस्थि व्यंगत्व आल्याचे प्रमाणित केले असेल त्या तारखेपासून किंवा त्यांच्या शासकीय सेवेतील नेमणुकीच्या तारखेपासून यापैकी जी तारीख नंतर असेल तेव्हा पासून विभाग प्रमुखांनी उक्त विशेष वाहन भत्ता मंजूर करावा. दिनांक १ जानेवारी १९८० पूर्वी शासकीय सेवेत असलेल्या अंध वा अस्थिव्यंगामुळे अपंग कर्मचाऱ्यांची विशेष वाहन भत्ता प्रकरणे शासन निर्णय, वित्त विभाग, क्रमांक टीआरए-१३७९/सीआर-१७३७/एसईआर-५, दिनांक २० फेब्रुवारी १९८० च्या परिच्छेद-२ मधील तरतुदीनुसार नियमित करण्यात यावीत.

३. या परिपत्रकाची इंग्रजी प्रत सोबत जोडली आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

अ. दा. घोडके,
शासनाचे उप सचिव,
वित्त विभाग.

प्रति
महालेखापाल, महाराष्ट्र-१, मुंबई.
महालेखापाल, महाराष्ट्र-२, नागपूर,
अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई (महाराष्ट्र राज्य),
मुख्य लेखा परीक्षक, स्थानिक निधी लेखा, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
निवासी लेखा परीक्षा अधिकारी, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
राज्यपालांचे सचिव,
मुख्य मंत्र्यांचे सचिव,
सर्व मंत्र्यांचे व राज्यमंत्र्यांचे स्वीय सहाय्यक,
*प्रबंधक, मूळ न्यायालय शाखा, उच्च न्यायालय, मुंबई.
*प्रबंधक, अपील शाखा, उच्च न्यायालय, मुंबई.
*सचिव, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, मुंबई,
*प्रबंधक, लोक आयुक्त व उप लोकआयुक्त, यांचे कार्यालय, मुंबई.
मंत्रालयाचे सर्व विभाग,

कृ.मा.प्र.

शासमु रोटा/वि.वि./८८-४०८(८००० ५-७-८१)

निवास व्यवस्था नियंत्रक, सामान्य प्रशासन विभाग, मुंबई,
निवासी आयुक्त, महाराष्ट्र सदन, कोपर्निकस रोड, नवी दिल्ली,
मंत्रालयाच्या निरनिराळ्या विभागांच्या अधीन असलेल्या सर्व विभागांचे व कार्यालयांचे प्रमुख,
सर्व जिल्हा परिषदांचे मुख्य कार्यकारी अधिकारी,
संपर्क अधिकारी, मंत्रालय, मुंबई,
वित्त विभागातील सर्व कार्यासने,
निवड नस्ती, कार्यासन एसईआर-५, वित्त विभाग.
*पत्राद्वारे..

क्रमांक दिनांक

यांच्या माहितीसाठी व मार्गदर्शनासाठी प्रत पाठविण्यात आली आहे.

---

**IMMEDIATE**

Special Conveyance Allowance-
Grant of - to Blind and
Orthopaedically Handicapped
Government employees.

GOVERNMENT OF MAHARASHTRA
Finance Department.
Circular No. TRA-1381/CR-544/SER-5.
Mantralaya, Bombay-400 032, Dated the 29th June 1981.

## CIRCULAR

According to para 2 of Government Resolution, Finance Department, No. TRA-1379/CR-1737/SER-5, dated the 20th February 1980, Blind and Orthopaedically handicapped Government employees have to apply to their respective Heads of Departments for grant of Special Conveyance Allowance. Thereupon the Heads of Departments should sanction the Special Conveyance Allowance in such cases from the date of receipt of the recommendations of the competent Medical Authorities and in case of employees already in Government Service with effect from 1st January 1980.

2. It is, however, possible that the Heads of Departments might not be receiving the recommendations from the Competent Medical Officers for grant of Special Conveyance Allowance to the Blind and Orthopaedically Handicapped Government Employees, in time. Considering such a possibility, Government is pleased to clarify that in case of Blind or Orthopaedically handicapped employees, who have entered the Government Services after 1st January 1980, the Special Conveyance Allowance should be granted by the Heads of Department from the date on which the blindness or Orthopaedically disability has occurred and accordingly certified as such, by the Competent Medical Authorities or from the date of appointment, whichever is later. However, cases of grant of Special Conveyance Allowance in respect of Blind or Orthopaedically handicapped persons employed in Government Service prior to 1st January 1980 should be regulated in accordance with the provisions contained in para 2 of the Government Resolution, Finance Department, No. TRA-1379/CR-1737/SER-5, dated the 20th February 1980.

By order and in the name of the Governor of Maharashtra,

A.D. GHODKE,
Deputy Secretary to Government,
Finance Department.

Copy to:-

The Accountant General, Maharashtra I, Bombay,
The Accountant General, Maharashtra II, Nagpur.

---

H-408(8,000-5-7-81)-a.

अपघात आणि अस्थिव्यंगामुळे अपंग असलेल्या शासकीय कर्मचाऱ्यांस वाहन भत्ता मंजूर करण्याबाबत.

महाराष्ट्र शासन
वित्त विभाग,
परिपत्रक क्रमांक टीआरो-१३८२/सीआर-९८४/एसईआर-५,
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२, दिनांक २० सप्टेंबर १९८२.

शासन परिपत्रक

शासन निर्णय, वित्त विभाग क्रमांक टीआरए-१३७९/सीआर-१७३७/एसईआर-५, दिनांक २० फेब्रुवारी १९८० च्या परिच्छेद ३ मधील तरतुदीनुसार, जेव्हा अपंग कर्मचाऱ्यांना संबंधित विभाग प्रमुखांमार्फत शासकीय रुग्णालयात कार्यालयीन ठिकाणाबाहेरच्या भागी, विशेष प्रवास भत्ता मिळण्यासाठीच्या पात्रतेबाबतचे प्रमाणपत्र मिळविण्यासाठी पाठविले जाते, तेव्हा अशा कर्मचाऱ्याला, प्रत्यक्ष प्रवास खर्चाची प्रतिपूर्ती अनुज्ञेय आहे. तसेच प्रवासात व रुग्णालयात लागणारा कालावधी हा सेवा कालावधी म्हणून समजण्यात येतो. या संबंधात असा प्रश्न उपस्थित करण्यात आला होता की, जे कर्मचारी संबंधित वैद्यकीय अधिकाऱ्यांकडून विशेष प्रवासभत्त्यासाठी लागणारे शिफारस प्रमाणपत्र मिळविण्यास पात्र ठरलेले नाहीत म्हणजेच ज्यांचे बाबतीत विशेष वाहन भत्त्याच्या पात्रतेसाठी आवश्यक तेवढे अपंगत्व नाही अशा कर्मचाऱ्यांना सुध्दा वरील सवलती अनुज्ञेय आहेत काय ? याबाबत असे स्पष्ट करण्यात येते की, जे कर्मचारी विशेष वाहन भत्त्यासाठीच्या अटी पूर्ण करून, वैद्यकीय शिफारसपत्र मिळविण्यास पात्र ठरलेले असतील अशाच कर्मचाऱ्यांना वर उल्लेखिलेल्या सवलती अनुज्ञेय असतील, अन्य कर्मचाऱ्यांना नाही.

२. ह्यापूर्वी निकालात काढलेल्या प्रकरणांचा नव्याने विचार होऊ नये.

३. या परिपत्रकाची इंग्रजी प्रत सोबत जोडली आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

प. द. जोशी,
कार्यासन अधिकारी, वित्त विभाग.

प्रति

१) महालेखापाल, महाराष्ट्र १, मुंबई,
२) महालेखापाल, महाराष्ट्र २, नागपूर,
३) अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई (महाराष्ट्र राज्य),
४) मुख्य लेखा परीक्षक, स्थानिक निधी लेखा, महाराष्ट्र राज्य, मुंबई,
५) राज्यपालांचे सचिव,
६) मुख्य मंत्र्यांचे सचिव,
*७) प्रबंधक, मूळ न्याय शाखा, उच्च न्यायालय, मुंबई,
८) सर्व मंत्र्यांचे व राज्य मंत्र्यांचे स्वीय सहाय्यक,
*९) प्रबंधक, अपील शाखा, उच्च न्यायालय, मुंबई,

एच-८०९(८५००+५-१०-८२)१.

*१०) सचिव, महाराष्ट्र लोकसेवा आयोग, मुंबई,
*११) प्रबंधक, लोक आयुक्त व उप लोक आयुक्त यांचे कार्यालय, मुंबई,
*१२) वरिष्ठ उप संचालक, वाणिज्य लेखा परीक्षा, शासकीय वाहतूक लेखा परीक्षा मंडळ, मुंबई,
१३) विशेष आयुक्त, महाराष्ट्र सदन, कोपर्निकस रोड, नवी दिल्ली,
१४) मंत्रालयाचे सर्व विभाग,
१५) मंत्रालयाच्या निरनिराळ्या विभागांच्या अधीन असलेल्या सर्व विभागांचे व कार्यालयांचे प्रमुख,
१६) सर्व जिल्हाधिकारी,
१७) सर्व विभागीय आयुक्त,
१८) सर्व जिल्हा परिषदांचे मुख्य कार्यकारी अधिकारी,
१९) सर्व जिल्हा परिषदांचे मुख्य लेखा व वित्तीय अधिकारी,
२०) संपर्क अधिकारी, मंत्रालय, मुंबई,
२१) वित्त विभागातील सर्व कार्यासने,
२२) निवड नस्ती, कार्यासन एसईआर-५, वित्त विभाग,
*२३) सचिव, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, मुंबई.

*पत्राद्वारे.

क्रमांक                                                  दिनांक

यांच्या माहितीसाठी व मार्गदर्शनासाठी प्रत पाठविण्यात आली आहे.

Grant of Conveyance Allowance to Blind and Orthopaedically handicapped Government Employees.

GOVERNMENT OF MAHARASHTRA
Finance Department,
Circular No. TRA-1382/CR-984/SER-5,
Mantralaya,Bombay 400 032, dated the 20th September 1982.

## CIRCULAR

As per para 3 of Government Resolution, Finance Department No. TRA-1379/CR-1737/SER-5, dated 20th February 1980, in cases where handicapped employees are referred by the Heads of Departments concerned to Government Hospitals located at stations outside their headquarters for getting recommendations for grant of conveyance allowance, are reimbursed actual travelling expenses. Further the period spent on journeys, as also at the Hospital, is also treated as duty. A question has been raised whether the above concessions would also be admissible to those employees who are not recommended conveyance allowance by the competent medical authority i.e. those who do not have the requisite disability to entitle them for the grant of conveyance allowance. It is hereby clarified that the concessions referred to above will be admissible only to those who satisfy the prescribed conditions and are recommended conveyance allowance by the competent medical authority and not to others.

2. Past cases settled otherwise need not be reopened.

By order and in the name of the Governor of Maharashtra,

P.D. JOSHI,
Desk Officer.

TA031

20051217150134001

अंध आणि अस्थिव्यंगामुळे अधू असलेल्या शासकीय कर्मचा-यांना मिळत असलेल्या विशेष वाहनभत्त्याची मर्यादा वाढविणे.

महाराष्ट्र शासन
वित्त विभाग,
शासन निर्णय क्रमांक टीआरए-१०८३-सीआर-१३७५-एसईआर-५,
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२, दिनांक ४ जानेवारी १९८४.

## शासन निर्णय

शासन असा आदेश देत आहे की, शासन निर्णय, वित्त विभाग क्रमांक टीआरए-१३७९-सीआर-१७३७-एसईआर-५, दिनांक २० फेब्रुवारी १९८० अन्वये विहित करण्यात आलेली विशेष वाहन भत्त्याची कमाल मर्यादा रु. ५० वरुन रु. ७५ दरमहा, अशी वाढविण्यात यावी.

२. हे आदेश, दिनांक १ जानेवारी १९८४ पासून अंमलात येतील.

३. ह्या आदेशांची इंग्रजी प्रत सोबत जोडली आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

प. द. जोशी,
कार्यासन अधिकारी,
वित्त विभाग.

प्रति

१] महालेखापाल-१, महाराष्ट्र, मुंबई,
२] महालेखापाल-२, महाराष्ट्र, नागपूर,
३] अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई [महाराष्ट्र राज्य],
४] मुख्य लेखा परीक्षक, स्थानिक निधी लेखा, महाराष्ट्र राज्य, मुंबई,
५] राज्यपालांचे सचिव,
६] मुख्य मंत्र्यांचे सचिव,
७] सर्व मंत्र्यांचे व राज्यमंत्र्यांचे स्वीय सहाय्यक,
x८] प्रबंधक, मूळ न्याय शाखा, उच्च न्यायालय, मुंबई,
x९] प्रबंधक, अपील शाखा, उच्च न्यायालय, मुंबई,
x१०] सचिव, महाराष्ट्र लोकसेवा आयोग, मुंबई,
x११] प्रबंधक, लोक आयुक्त व उप लोक आयुक्त यांचे कार्यालय, मुंबई,
x१२] वरिष्ठ उप संचालक, वाणिज्य लेखा परीक्षा, शासकीय वाहतुक लेखा परीक्षा मंडळ, मुंबई,
x१३] विशेष आयुक्त, महाराष्ट्र सदन, कोपर्निकस रोड, नवी दिल्ली,
१४] मंत्रालयाचे सर्व विभाग,

कृ.मा.प.

एप-९३७[९०००÷५-१-८४]

१५] मंत्रालयाच्या निरनिराळ्या विभागांच्या अधीन असलेल्या सर्व विभागांचे व कार्यालयांचे प्रमुख,
१६] सर्व जिल्हाधिकारी,
१७] सर्व विभागीय आयुक्त,
१८] सर्व जिल्हा परिषदांचे मुख्य कार्यकारी अधिकारी,
१९] सर्व जिल्हा परिषदांचे मुख्य लेखा व वित्तीय अधिकारी,
२०] संपर्क अधिकारी, मंत्रालय, मुंबई,
२१] वित्त विभागातील सर्व कार्यासने,
२२] निवड नस्ती, कार्यासन एसईआर-५, वित्त विभाग,
×२३] सचिव, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, मुंबई.

---

×पत्राद्वारे. क्रमांक दिनांक
यांच्या माहितीसाठी व मार्गदर्शनासाठी प्रत पाठविण्यात आली आहे.

---

Conveyance allowance to Blind and Orthopaedically handicapped employees -
Increase in the limit of ..

GOVERNMENT OF MAHARASHTRA
Finance Department,
Resolution No. TRA-1083/CR-1375/SER-5,
Mantralaya, Bombay 400 032, dated the 4th January 1984.

## RESOLUTION

Government is pleased to direct that the maximum ceiling of Special Conveyance Allowance prescribed in Government Resolution, Finance Department No. TRA-1379/CR-1737/SER-5, dated 20th February 1980 should be raised from the existing ceiling of Rs. 50/- to Rs. 75/- p.m.

2. These orders take effect from 1st January 1984.

By order and in the name of the Governor of Maharashtra,

P.D. JOSHI,
Desk Officer,
Finance Department.

---

20060830153213001

अंध आणि अस्थीव्यंगामुळे अपंग असलेल्या शासकीय कर्मचा-यांना विशेष वाहनभत्ता मंजूर करणे.

महाराष्ट्र शासन
वित्त विभाग,
परिपत्रक क्र. टीआरए-१३८३-सीआर-१४५४/एसईआर-५
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२, दिनांक १० जानेवारी १९८४.

परिपत्रक

शासन निर्णय, वित्त विभाग क्रमांक टीआरए-१३७९-सीआर-१७३७-एसईआर-५, दिनांक २० फेब्रुवारी १९८० अन्वये वेळोवेळी सुधारणा केल्याप्रमाणे अंध आणि अस्थिव्यंगामुळे अपंग असलेल्या शासकीय कर्मचा-यांना वेतनाच्या १० टक्के परंतु जास्तीत जास्त रु. ५० इतका विशेष वाहनभत्ता मंजूर करण्याचे आदेश काढण्यात आले आहेत. वरील भत्ता मंजूर करताना अंधत्व म्हणजे नेमके काय हा प्रश्न शासनाच्या विचाराधिन होता. शासनाने आता असा निर्णय घेतला आहे की, ज्या शासकीय कर्मचा-यांची दोन्ही डोळ्यांची दृष्टी ३/६० पेक्षा कमी आहे अथवा दृष्टीक्षेत्र (फील्डव्हीजन) १० अंशा-पेक्षा कमी आहे, असे शासकीय कर्मचारीसुध्दा वर नमूद केलेल्या शासन निर्णयातील अटींच्या अधीन राहून विशेष वाहनभत्ता मिळण्यास पात्र समजण्यात यावेत. परंतु एका डोळ्याने अंध असलेले शासकीय कर्मचारी हा विशेष वाहनभत्ता मंजूर होण्यास पात्र असणार नाहीत.

२. जे कर्मचारी सेवेमध्ये आहेत, त्यांच्याबाबतीत हे आदेश निर्गमित झालेल्या दिनांकापासून अंमलात असतील तर त्यांचेबाबतीत अशाप्रकारची अपंगता भविष्यात निर्माण होईल ते कर्मचारी, सक्षम वैद्यकीय अधिका-यांच्या शिफारशी, संबंधीत विभाग प्रमुखास मिळालेल्या दिनांकापासून, विशेष वाहनभत्ता मिळण्यास पात्र ठरतील.

३. ह्या परिपत्रकाची इंग्रजी प्रत सोबत जोडली आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

बा. व. सावंत,
कार्यासन अधिकारी.

प्रति

महालेखापाल, महाराष्ट्र-१, मुंबई,
महालेखापाल, महाराष्ट्र-२, नागपूर,
अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई,
मुख्य लेखा परीक्षक, स्थानिक निधी हिशेब, मुंबई,
उप मुख्य लेखा परीक्षक, स्थानिक निधी हिशेब, मुंबई/पुणे/नागपूर/औरंगाबाद,

शामगु स्टेट/वित्त-एच-९६०(९,०००-५-१-८४)-१

200609301528070001

अंध व अस्थिव्यंगामुळे अधू असलेल्या शासकीय कर्मचाऱ्यांना विशेष वाहन भत्ता.

महाराष्ट्र शासन

वित्त विभाग

शासन निर्णय क्रमांक विवाभ-१३८८/सीआर-६८०/सेवा-५

मंत्रालय, मुंबई ४०० ०३२, दिनांक ८ मार्च १९८९

पहा.—(१) शासन निर्णय, वित्त विभाग, क्रमांक टीआरए-१३७९/सीआर-१७३७/एसईआर-५, दिनांक २० फेब्रुवारी १९८०.

(२) शासन निर्णय, वित्त विभाग, क्रमांक टीआरए-१०८३/सीआर-१३७५/एसईआर-५, दिनांक ४ जानेवारी १९८४.

शासन निर्णय

वर (१) येथे निर्देशित केलेल्या शासन निर्णयान्वये अंध व हातापायांच्या विकलांगतेसहित अस्थिव्यंगामुळे अधू असलेल्या शासकीय कर्मचाऱ्याला वेतनाच्या १० टक्के पण कमाल रु. ५०/- दरमहा या दराने विशेष वाहन भत्ता मंजूर करण्यात आला आहे व वरील (२) येथे निर्देशिलेल्या शासन निर्णयान्वये सदर भत्त्याची कमाल मर्यादा रु. ७५/- दरमहा अशी वाढविण्यात आली आहे. केंद्र शासनाने चतुर्थ वेतन आयोगाच्या शिफारशीनुसार, सदर विशेष वाहन भत्त्याचा दर, सुधारित वेतनश्रेणीचे संदर्भात मूळ वेतनाच्या ५ टक्के पण कमाल रु. १००/- दरमहा असा निश्चित केलेला आहे. राज्य शासकीय कर्मचाऱ्यांसाठी, सुधारित वेतनश्रेणीचे संदर्भात विशेष वाहन भत्त्याचा दर निश्चित करण्याचा प्रश्न शासनाच्या काही काळ विचाराधीन होता. शासन आता असा आदेश देत आहे की, अंध व हातापायांच्या विकलांगतेसहित अस्थिव्यंगाने अधू असलेल्या कर्मचाऱ्यांना मंजूर करण्यात आलेला विशेष वाहन भत्त्याचा दर दिनांक १ फेब्रुवारी १९८९ पासून, महाराष्ट्र नागरी सेवा (सुधारित वेतन) नियम, १९८८ अन्वये लागू करण्यात आलेल्या सुधारित वेतनश्रेणीतील मूळ वेतनाच्या ५ टक्के पण कमाल रु. १००/- दरमहा असा असेल. जे कर्मचारी सुधारणापूर्व वेतनश्रेणी चालू ठेवण्याचा विकल्प देतील त्यांचेबाबतीत, त्यांच्या वेतनात सुधारणापूर्व वेतनश्रेणीतील मूळ वेतनाबरोबरच दिनांक १ जानेवारी १९८६ रोजी अनुज्ञेय असलेला महागाई भत्ता, २ अंतरिम वाढी, अधिक मूळ वेतनाच्या २० टक्के तदर्थ वाढ (किमान रु. ७५/-) यांचा अंतर्भाव असेल. विशेष वाहन भत्त्यासंबंधीच्या शासन निर्णय, वित्त विभाग, क्रमांक टीआरए-१३७९/सीआर-१७३७/एसईआर-५, दिनांक २० फेब्रुवारी १९८० मध्ये विहित करण्यात आलेल्या अटी तशाच राहातील.

२. शासन असाही आदेश देत आहे की, दिनांक १ फेब्रुवारी १९८९ पूर्वीच्या कालावधीसाठी विशेष वाहन भत्त्याचा दर व मर्यादा, वेतन सुधारणेनंतरही सध्याप्रमाणेच वेतनाच्या १० टक्के पण कमाल रु. ७५/- दरमहा असा असेल व त्यासाठी दिनांक १ जानेवारी १९८६ पासून लागू करण्यात आलेल्या वेतन पुनर्रचनेपूर्वीच्या वेतनश्रेणीतीलच असुधारित वेतन विचारात घेतले जाईल.

३. या निर्णयाची इंग्रजी प्रत सोबत जोडली आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

सु. स. जाधव,
शासनाचे अवर सचिव.

(शा.म.मु.) एच २७९७ (१०,०००—३-८९)

प्रती,

महालेखापाल-१ (लेखा व अनुज्ञेयता), महाराष्ट्र, मुंबई,
महालेखापाल-२ (लेखा व अनुज्ञेयता), महाराष्ट्र, नागपूर,
महालेखापाल-१ (लेखापरीक्षा), महाराष्ट्र, मुंबई,
महालेखापाल-२ (लेखापरीक्षा), महाराष्ट्र, नागपूर,
अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई,
निवासी लेखापरीक्षा अधिकारी, मुंबई,
राज्यपालांचे सचिव,
मुख्य मंत्र्यांचे सचिव,
सर्व मंत्री आणि राज्यमंत्री यांचे स्वीय सहायक,
मंत्रालयीन सर्व विभाग,
सर्व विभागीय आयुक्त,
मंत्रालयाच्या सर्व विभागाखालील विभाग प्रमुख व कार्यालय प्रमुख,
*प्रबंधक, उच्च न्यायालय (मूळ शाखा), मुंबई,
*प्रबंधक, उच्च न्यायालय (अपील शाखा), मुंबई,
*सचिव, महाराष्ट्र लोकसेवा आयोग, मुंबई,
*सचिव, महाराष्ट्र विधान मंडळ सचिवालय, मुंबई,
*प्रबंधक, लोक आयुक्त व उप लोक आयुक्त यांचे कार्यालय, मुंबई,
सिनियर रिसर्च ऑफिसर, पे रिसर्च युनिट, भारत सरकार, वित्त मंत्रालय (व्यय विभाग), खोली क्र. २६१, नॉर्थ ब्लॉक, नवी दिल्ली,
संचालक, लेखा व कोषागारे, मुंबई,
मुख्य लेखापरीक्षक, स्थानिक निधी हिशेब, मुंबई,
उप मुख्य लेखापरीक्षक, स्थानिक निधी हिशेब, मुंबई/पुणे/नागपूर/औरंगाबाद/नाशिक/अमरावती,
जनसंपर्क अधिकारी, मंत्रालय, मुंबई,
सर्व जिल्हा परिषदांचे मुख्य कार्यकारी अधिकारी,
सर्व जिल्हा परिषदांचे मुख्य लेखा व वित्त अधिकारी,
सर्व जिल्हा कोषागार अधिकारी,
वित्त विभागातील सर्व कार्यासने,
निवड फाईल, वित्त विभाग-सेवा-५.

*पत्राद्वारे.

१९८९ चा क्रमांक

माहिती व मार्गदर्शनाकरिता प्रत रवाना.

Special Conveyance Allowance—
Grant of—to blind and orthopaedically handicapped employees.

# GOVERNMENT OF MAHARASHTRA

## FINANCE DEPARTMENT

Resolution No. SCA-1388/CR-680/SER-5

Mantralaya, Bombay 400 032, dated the 8th March 1989

*Read.*—(1) Government Resolution, Finance Department, No. TRA-1379/CR-1737/SER-5, dated 20th February 1980.

(2) Government Resolution, Finance Department, No. TRA-1083/CR-1375/SER-5, dated 4th January 1984.

## *GOVERNMENT RESOLUTION*

Under Government Resolution, Finance Department quoted at (1) above, a special conveyance allowance at 10 per cent of basic pay subject to a maximum of Rs. 50/- p. m. has been sanctioned to such Government employees as are blind or are orthopaedically handicapped with disability of lower extremities. The above maximum limit has been raised to Rs. 75/- p.m. under Government Resolution, Finance Department quoted at (2) above. On the basis of the recommendations of the Fourth Central Pay Commission, the Central Government has fixed the rate of special conveyance allowance, with reference to the revised pay-scales, at 5 per cent of the basic pay subject to a maximum of Rs. 100/- p.m. The question of revising the rate of special conveyance allowance for State Government employees in the context of the revised pay-scales was under consideration for some time. Government is pleased to direct that the rate of special conveyance allowance for the blind and orthopaedically handicapped employees including disability of hands and feet shall, with effect from 1st February 1989, be 5 per cent of the basic pay subject to a maximum of Rs. 100/- p.m. in the revised pay-scales, prescribed under Maharashtra Civil Services (Revised Pay) Rules, 1988. In the case of employees who opt to draw pay in the prerevised scale, their pay will include, in addition to the basic pay in the prerevised scale, the dearness allowance admissible as on 1st January 1986, amount of two interim reliefs *plus ad hoc* increase of 20 per cent of basic pay subject to a minimum of Rs. 75/-.

Other conditions for grant of special conveyance allowance prescribed under Government Resolution, Finance Department, No. TRA-1379/CR-1737/SER-5, dated 20th February 1980 will continue to operate.

2. Government is also pleased to direct that for the period prior to 1st February 1989, the rate and the maximum limit of the special conveyance allowance even after the revision of pay-scales shall be as at present i.e. 10 per cent of basic pay subject to a maximum of Rs. 75/- p.m. and for this purpose, unrevised pay in the pay-scales existing prior to revised pay-scales applicable from 1st January 1986 will be taken into consideration.

By order and in the name of the Governor of Maharashtra,

S. S. JADHAV,
Under Secretary to Government.

कण्याच्या विकाराने पीडीत असलेल्या
शासकीय कर्मचाऱ्यांना विशेष वाहनभत्ता
मंजूर करणे.

महाराष्ट्र शासन
वित्त विभाग,
शासन निर्णय क्रमांक–विभाभ–१३९०/प्र.क्र.३६१/सेवा–५,
मंत्रालय, मुंबई–४०० ०३२, दिनांक २० एप्रिल १९९०.

वाचा :- १] शासन निर्णय, वित्त विभाग क्र. टिएआरए–१३७९/सीआर–१७३७/एसईआर–५, दिनांक २० फेब्रुवारी १९८०

२] शासन निर्णय, वित्त विभाग क्र. विभाभ–१३८८/सीआर–६८०/सेवा–५, दिनांक ८ मार्च १९८९.

शासन निर्णय :- वर [१] येथे निर्देशित केलेल्या शासन निर्णयान्वये अंध व हातापायाच्या विकलांगतेसहित अस्थिव्यंगामुळे अपंग असलेल्या शासकीय कर्मचाऱ्यांना वेतनाच्या १० टक्के पण कमाल रु.५०/- दरमहा या दराने विशेष वाहनभत्ता मंजूर करण्यात आला आहे व वरील [२] येथे निर्देशिलेल्या शासन निर्णयान्वये, केंद्र शासनाच्या चतुर्थ वेतन आयोगाच्या शिफारशीनुसार सदर विशेष वाहनभत्ता सुधारित वेतनश्रेणीचे संदर्भात मूळ वेतनाच्या ५ टक्के पण कमाल रु.१००/- दरमहा असा निश्चित करण्यात आला आहे. जे शासकीय कर्मचारी पाठीच्या कण्याच्या विकाराने पीडीत आहेत [ Spinal deformity - generally known as Hunch back disability ] अशा शासकीय कर्मचाऱ्यांना, उपरनिर्दिष्ट शासन निर्णय दिनांक २० फेब्रुवारी ८० व ८ मार्च ८९ अन्वये मंजूर करण्यात आलेला विशेष वाहनभत्ता मंजूर करण्याचा प्रश्न शासनाच्या विचाराधीन होता. शासन आता असा आदेश देत आहे की [कार्यालयीन कर्मचाऱ्यांसहित] नियमित आस्थापनेवर असलेल्या व हंच बॅक डिसॅबिलिटी [Hunch back disability ] म्हणून ओळखल्या जाणाऱ्या पाठीच्या कण्याच्या आजाराने पीडीत असलेल्या कर्मचाऱ्यांना त्यांच्या मूळ वेतनाच्या ५ टक्के पण कमाल रुपये १००/- दरमहा एवढा विशेष वाहनभत्ता खाली दर्शविलेल्या अटींचे अधीन राहून मंजूर करण्यात यावा :-

[१] वर नमूद केलेल्या पाठीच्या कण्याच्या विकाराने पीडीत असल्याने ४०% हून अधिक प्रमाणात आंशिक अपंगत्व आले आहे असे प्रमाणित करणारे शासकीय रुग्णालयातील अस्थिव्यंगोपचार अधिकारी [वर्ग–१] यांचे प्रमाणपत्र सादर करण्यात यावे.

[२] शासकीय रुग्णालयातील अस्थिव्यंगोपचार अधिकारी [वर्ग–१] यांनी अपंगत्व ज्या तारखेस आले आहे असे प्रमाणित केले असेल त्या दिनांकापासून, किंवा १ एप्रिल १९९० ह्यापैकी जो दिनांक नंतरचा असेल त्या दिनांकापासून विशेष वाहनभत्ता मंजूर करण्यात यावा.

कृ. मा. प.

शासमु. रोटा/वि. वि./एप–१७२ [१०,०००+२०–५–९०]

उक्त दोन अटींखेरीज शा. नि. वि. वि. क्र. टीआरए-१३७९/सीआर-१७३७/ एसईआर-५, दिनांक २० फेब्रुवारी १९८० मधील इतर अटीही हयाबाबतीत लागू राहतील.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

अ. कृ. गोलतकर,
शासनाचे अवर सचिव,
वित्त विभाग.

प्रती,

महालेखापाल-१ [लेखा व अनुज्ञेयता], महाराष्ट्र, मुंबई,
महालेखापाल-२ [लेखा व अनुज्ञेयता], महाराष्ट्र, नागपूर,
महालेखापाल-१ [लेखापरीक्षा], महाराष्ट्र, मुंबई,
महालेखापाल-२ [लेखापरीक्षा], महाराष्ट्र, नागपूर,
अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई,
निवासी लेखापरीक्षा अधिकारी, मुंबई,
राज्यपालांचे सचिव,
मुख्यमंत्र्यांचे सचिव,
सर्व मंत्री आणि राज्यमंत्री यांचे स्वीय सहाय्यक,
मंत्रालयीन सर्व विभाग,
सर्व विभागीय आयुक्त,
मंत्रालयाच्या सर्व विभागाखालील विभाग प्रमुख व कार्यालय प्रमुख,
* प्रबंधक, उच्च न्यायालय [मूळ शाखा], मुंबई,
* प्रबंधक, उच्च न्यायालय [अपील शाखा], मुंबई,
* सचिव, महाराष्ट्र लोकसेवा आयोग, मुंबई,
* सचिव, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, मुंबई,
* प्रबंधक, लोक आयुक्त व उप लोक आयुक्त यांचे कार्यालय, मुंबई,
सिनियर रिसर्च ऑफिसर, पे रिसर्च युनिट, भारत सरकार, वित्त मंत्रालय [व्यय विभाग], खोली क्र. २६१, नॉर्थ ब्लॉक, नवी दिल्ली,
संचालक, लेखा व कोषागारे, मुंबई,
मुख्य लेखापरीक्षक, स्थानिक निधी हिशोब, मुंबई,
उप मुख्य लेखापरीक्षक, स्थानिक निधी हिशोब, मुंबई/पुणे/नागपूर/औरंगाबाद/ नाशिक/अमरावती.
जनसंपर्क अधिकारी, मंत्रालय, मुंबई,
सर्व जिल्हा परिषदांचे मुख्य कार्यकारी अधिकारी,
सर्व जिल्हा परिषदांचे मुख्य लेखा व वित्त अधिकारी,
सर्व जिल्हा कोषागार अधिकारी,
वित्त विभागातील सर्व कार्यासने,
निवड नस्ती, वित्त विभाग, सेवा-५

* पत्राद्वारे.

राज्य शासकीय कर्मचाऱ्यांना व इतरांना वाहतूक भत्ता मंजूर करणेबाबत

# महाराष्ट्र शासन

## वित्त विभाग

शासन निर्णय, क्रमांक वाहभ-१०९८/प्र. क्र. ८३/९८/सेवा-५,
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२, दिनांक १४ डिसेंबर १९९८.

पहा.–(१) शासन निर्णय, वित्त विभाग, क्रमांक टीआरए-१३७९/प्र. क्र. १७३७/सेवा-५, दिनांक २० फेब्रुवारी १९८०.

(२) शासन निर्णय, वित्त विभाग, क्रमांक टीआरए-१०८३/प्र. क्र. १३७५/सेवा-५, दिनांक ४ जानेवारी १९८४.

(३) शासन निर्णय, वित्त विभाग, क्रमांक टीआरए-१३८३/प्र. क्र. १४५४/सेवा-५, दिनांक १० जानेवारी १९८४.

(४) शासन निर्णय, वित्त विभाग, क्रमांक विवाभ-१३८८/प्र. क्र. ६८०/सेवा-५, दिनांक ८ मार्च १९८९.

(५) केंद्र शासन, वित्त मंत्रालय, व्यय विभाग यांचे कार्यालयीन ज्ञापन क्र. २१ (१) ९७/इ-दोन (बी), दिनांक ३ ऑक्टोबर १९९७.

## शासन निर्णय

केंद्र शासनाने आपल्या कर्मचाऱ्यांना उपरोल्लिखित अनुक्रमांक ५ येथील आदेशानुसार निवासस्थानापासून कर्तव्य स्थानापर्यंतच्या प्रवासावरील खर्चाची भरपाई म्हणून वाहतूक भत्ता (Transport Allowance) मंजूर केला आहे. केंद्र शासनाच्या धर्तीवर राज्य शासकीय कर्मचारी व इतर यांना वाहतूक भत्ता मंजूर करण्याचा प्रश्न शासनाच्या काही काळ विचाराधीन होता. शासन आता असे आदेश देत आहे की, **दिनांक १ ऑक्टोबर १९९८ पासून** राज्य शासकीय कर्मचारी व इतर यांना वाहतूक भत्ता खालील तक्त्यात दर्शविल्याप्रमाणे मंजूर करण्यात यावा.

तक्ता

| अनुक्रमांक | कर्मचाऱ्याची वेतनश्रेणी | दरमहा वाहतूक भत्त्याचा दर (रुपये) | |
|---|---|---|---|
| | | "अ-१" आणि "अ" वर्ग शहरे | इतर ठिकाणे |
| १ | रु. ८०००—१३५०० किंवा त्याहून वरच्या वेतनश्रेणीमध्ये वेतन घेणारे कर्मचारी. | ८०० | ४०० |
| २ | रु. ६५००—१०५०० किंवा त्याहून वरच्या परंतु रु. ८०००—१३५०० पेक्षा खालच्या वेतनश्रेणीमध्ये वेतन घेणारे कर्मचारी. | ४०० | २०० |
| ३ | रु. ६५००—१०५०० पेक्षा खालच्या वेतनश्रेणीमध्ये वेतन घेणारे कर्मचारी. | १०० | ७५ |

२. ह्या आदेशातील वाहतूक भत्त्याचे प्रदान खालील अटींच्या अधिन आणि त्यानुसार विनियमित करण्यात येईल.

(एक) या आदेशांमध्ये नमूद केलेली "अ-१" आणि "अ" शहरे, स्थानिक पूरक भत्त्याच्या प्रयोजनार्थ केलेल्या शहरांच्या वर्गीकरणाप्रमाणे राहतील.

(G.C.P.) H 2121-15000-12-98

(दोन) कर्तव्य स्थानापासून एक किलोमीटर अंतराच्या आत किंवा कर्तव्यस्थान आणि निवासस्थान ह्यांच्या एकत्र परिसरात (Campus) शासकीय निवासस्थान पुरविण्यात आलेल्या कर्मचाऱ्यांना हा भत्ता अनुज्ञेय असणार नाही.

**टीप.**—ह्या आदेशांतील भत्त्याचे प्रदान, संबंधित कर्मचाऱ्याने, त्याला पुरविण्यात आलेले शासकीय निवासस्थान, कर्तव्य स्थानापासून एक किलोमीटर अंतराच्या आत किंवा कर्तव्यस्थान आणि निवासस्थान यांच्या एकत्र परिसरात (Campus) नाही अशा आशयाचे प्रमाणपत्र देण्याच्या अधिन राहून करण्यात येईल.

(तीन) ज्या कर्मचाऱ्यांना शासकीय वाहतूक सुविधा (Government Transport) पुरविण्यात आली आहे त्यांना हा भत्ता अनुज्ञेय असणार नाही.

(चार) ज्या कर्मचाऱ्यांनी असुधारित वेतनश्रेणीत वेतन घेण्याचा विकल्प दिलेला आहे अशांच्या बाबतीत त्यांनी जर सुधारित वेतनश्रेणी स्वीकारण्याबाबतचा विकल्प दिला असता तर त्यांना जी सुधारित वेतनश्रेणी देय ठरली असती त्या वेतनश्रेणीच्या अनुषंगाने वाहतूक भत्ता विनियमित करण्यात येईल.

(पाच) शासन निर्णय वित्त विभाग क्रमांक टीआरए-१३७९/सीआर-१७३७/एसईआर-५, दिनांक २० फेब्रुवारी १९८० व त्यात वेळोवेळी केलेल्या सुधारणेनुसार, अंध व हातापायाच्या विकलांगतेसहित अस्थी व्यंगामुळे अधू असलेल्या सर्व राज्य शासकीय कायम आस्थापनेवरील कर्मचाऱ्यांना (कार्यव्ययी आस्थापनेवरील कर्मचाऱ्यांसह) विशेष वाहन भत्ता मंजूर करण्यात आलेला आहे. हे आदेश अंमलात आल्यानंतर सदर विशेष वाहन भत्ता बंद करण्यात यावा आणि त्याऐवजी अशा कर्मचाऱ्यांना या आदेशानुसार विहित करण्यात आलेल्या दराच्या दुप्पट दराने वाहतूक भत्ता प्रदान करण्यात यावा. तथापि, कर्तव्यस्थानापासून एक किलोमीटर अंतराच्या आत किंवा कर्तव्यस्थान व निवासस्थान यांचा एकत्र परिसर असेल अशा ठिकाणी राहणाऱ्या कर्मचाऱ्यांना हा भत्ता या आदेशानुसार सर्वसाधारण दराने अनुज्ञेय राहील. तसेच हा भत्ता ज्याना शासकीय वाहन पुरविलेले आहे त्यांना अनुज्ञेय असणार नाही.

३. रजा, प्रशिक्षण, दौरा इत्यादी कारणांमुळे ३० दिवसांपेक्षा जास्त अनुपस्थितीच्या कालावधीसाठी हा भत्ता अनुज्ञेय असणार नाही.

४. शासन असाही आदेश देत आहे की, सर्व अनुदानप्राप्त शैक्षणिक संस्थांच्या प्राथमिक, माध्यमिक शाळांतील पूर्णकालिक शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी तसेच कृषि व कृषितर विद्यापीठातील व तत्संलग्न महाविद्यालयातील शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी त्याचप्रमाणे शासन निर्णय, वित्त विभाग क्रमांक मभवा-११८६/३९४/सेवा-१०, दिनांक १८ ऑगस्ट १९८६ मधील परिच्छेद ६ मध्ये उल्लेखिलेले इतर कर्मचारी ह्यांना सदरहू आदेश लागू असतील.

५. महाराष्ट्र जिल्हा परिषदा व पंचायत समित्या अधिनियम, १९६१ (सन १९६२ चा अधिनियम क्रमांक ५) च्या कलम २४८ च्या परंतुकान्वये प्रदान केलेले अधिकार व त्या संबंधातील इतर सर्व अधिकार यांचा वापर करून शासन असाही आदेश देत आहे की, जिल्हा परिषदांच्या पूर्णकालिक कर्मचाऱ्यांनासुद्धा हे आदेश योग्य त्या फेरफारासह लागू करण्यात यावेत.

६. शासन असाही आदेश देत आहे की, विद्यापीठ अनुदान आयोगाच्या वेतनमानानुसार वेतन घेणाऱ्या शिक्षक कर्मचाऱ्यांनाही हे आदेश लागू करण्यात यावेत.

७. संबंधित विभागीय प्रमुखांनी सदरहू आदेश स्थानिक संस्थांच्या अणि सर्व संबंधित संस्थांच्या व्यवस्थापनांच्या निदर्शनास आणून द्यावेत. शासनाने वेळोवेळी मंजूर केलेल्या सहाय्यक अनुदान नियमानुसार या भत्त्यासाठी सहाय्यक अनुदान अनुज्ञेय होईल असे त्यांनी व्यवस्थापनांना कळवावे.

८. शासकीय कर्मचाऱ्यांच्या बाबतीत वाहतूक भत्त्यावरील खर्च "मागणी क्रमांक जी-८-२०७०-इतर प्रशासकीय सेवा-८००, इतर खर्च-(सहा) वेतन, घरभाडे भत्ता व स्थानिक पूरक भत्ता यांच्यात सुधारणा झाल्यामुळे त्यासाठीची ठोक तरतूद" या शीर्षाखाली खर्ची घालण्यात यावा.

अनुदानप्राप्त संस्था व जिल्हा परिषदा यांच्या कर्मचाऱ्यांच्या बाबतीतील खर्च संबंधित प्रमुख लेखाशीर्षाखालील ज्या ग्राशीर्षाखाली त्यांच्या सहायक अनुदानाचा खर्च खर्ची घालण्यात येतो त्या उपलेखाशीर्षाखाली खर्ची घालण्यात यावा.

९. वाहतूक भत्ता संबंधीत कर्मचाऱ्याच्या वेतनासमवेत मासिक वेतन देयकात काढण्यात यावा.

१०. ह्या आदेशाची इंग्रजी प्रत सोबत जोडली आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

**(श. वि. लागवणकर,)**
शासनाचे उप सचिव.

---

प्रति,

महालेखापाल-१ (लेखा व अनुज्ञेयता), महाराष्ट्र, मुंबई.
महालेखापाल-२ (लेखा व अनुज्ञेयता), महाराष्ट्र, नागपूर.
महालेखापाल-१ (लेखापरीक्षा), महाराष्ट्र, मुंबई.
महालेखापाल-२ (लेखापरीक्षा), महाराष्ट्र, नागपूर.
अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई.
निवासी लेखापरीक्षा अधिकारी, मुंबई
राज्यपालाचे सचिव.
मुख्य मंत्र्यांचे अपर मुख्य सचिव.
उप मुख्य मंत्र्यांचे सचिव.
सर्व मंत्री आणि राज्यमंत्री यांचे स्वीय सहायक.
मंत्रालयीन सर्व विभाग.
सर्व विभागीय आयुक्त.
मंत्रालयाच्या सर्व विभागांखालील विभाग प्रमुख व कार्यालय प्रमुख.
*प्रबंधक, उच्च न्यायालय(मूळ शाखा), मुंबई.
*प्रबंधक, उच्च न्यायालय (अपील शाखा), मुंबई.
*सचिव, महाराष्ट्र लोकसेवा आयोग, मुंबई.
*सचिव, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, मुंबई.
*प्रबंधक, लोक आयुक्त व उप लोक आयुक्त यांचे कार्यालय, मुंबई
*सहसंचालक, ऑल इंडिया इन्स्टिट्युट ऑफ लोकल सेल्फ गव्हर्नमेंट, मुंबई.
शालेय शिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई (२० प्रती).
ग्रामविकास व जलसंधारण विभाग, मंत्रालय, मुंबई (२० प्रती).
नगरविकास विभाग, यूडी-१०, मंत्रालय, मुंबई (२० प्रती).
कृषि व पशुसंवर्धन, दुग्ध व्यवसाय विकास, मत्स्यव्यवसाय विभाग, (२० प्रती)
आदिवासी विकास विभाग (२० प्रती).
संचालक, लेखा व कोषागारे, मुंबई.
मुख्य लेखा परीक्षक, स्थानिक निधि हिशेब, मुंबई
उप मुख्य लेखा परीक्षक, स्थानिक निधि हिशेब, मुंबई/पुणे/नागपूर/औरंगाबाद/नाशिक/अमरावती.
जिल्हा लेखापरीक्षा अधिकारी, स्थानिक निधि हिशेब, महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहुरी, जिल्हा अहमदनगर
जिल्हा लेखापरीक्षा अधिकारी, स्थानिक निधि हिशेब, कोकण कृषि विद्यापीठ, दापोली, जिल्हा रत्नागिरी.
जनसंपर्क अधिकारी, मंत्रालय, मुंबई.
सर्व जिल्हा परिषदांचे मुख्य कार्यकारी अधिकारी.
सर्व जिल्हा परिषदांचे मुख्य लेखा व वित्त अधिकारी.
शिक्षण संचालक, महाराष्ट्र राज्य, पुणे (२५ प्रती).
उच्च शिक्षण संचालक, महाराष्ट्र राज्य, पुणे (२५ प्रती).
कला संचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई (४० प्रती).
संचालक, तंत्र शिक्षण, महाराष्ट्र राज्य, मुंबई (१०० प्रती).
संचालक, तांत्रिक प्रशिक्षण, द्वारा--तंत्र शिक्षण संचालक, मुंबई (२५० प्रती).
सिनियर रिसर्च ऑफिसर, पे रिसर्च युनीट, भारत सरकार, वित्त मंत्रालय (व्यय विभाग), खोली क्र. २६१, नॉर्थ ब्लॉक नवी दिल्ली.
सर्व विभागीय शिक्षण उप संचालक (प्रत्येकी १० प्रती).
सर्व विभागीय तंत्र शिक्षण उप संचालक (प्रत्येकी १० प्रती)
सर्व जिल्हा परिषदांचे शिक्षणाधिकारी.
आयुक्त, महानगरपालिका, नागपूर.
प्रशासकीय अधिकारी, पश्चिम महाराष्ट्रातील नगरपालिका शिक्षण मंडळे (पुणे/कोल्हापूर/सोलापूर या महानगरपालिकांची शिक्षण मंडळे यांसह).
मुख्य अधिकारी, सर्व नगरपालिका.
कार्यकारी अधिकारी, कॅन्टोनमेंट बोर्ड, खडकी/देहू रोड/देवळाली/अहमदनगर.
सर्व जिल्हा कोषागार अधिकारी
संचालक, आदिवासी कल्याण, महाराष्ट्र राज्य, नाशिक (१० प्रती)
संचालक, समाजकल्याण, महाराष्ट्र राज्य, पुणे (१० प्रती).

**राज्य शासकीय कर्मचाऱ्यांना व इतरांना**
**वाहतूक भत्ता मंजूर करण्याबाबत**

महाराष्ट्र शासन

**वित्त विभाग**

शासन शुद्धीपत्रक क्रमांक वाहभ–१०९८/प्र.क्र. ८३/९८/सेवा-५
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२, दिनांक ६ जानेवारी १९९९

***पहा.*** —— शासन निर्णय, वित्त विभाग, क्रमांक वाहभ–१०९८/प्र.क्र. ८३/९८/सेवा-५,
दिनांक १४ डिसेंबर १९९८.

***शुद्धीपत्रक***

उपरोल्लिखित शासन निर्णय, वित्त विभाग, दिनांक १४ डिसेंबर १९९८ च्या परिच्छेद ८ ऐवजी खालील परिच्छेद ८ वाचावा :—

"८. शासकीय कर्मचाऱ्यांच्या बाबतीत या आदेशाच्या परिणामी होणारा वाहतूक भत्त्यावरील खर्च हा त्यांचे वेतन व भत्ते यासंबंधीचा खर्च ज्या संबंधित लेखाशीर्षाखाली खर्ची घालण्यात येतो त्याच लेखाशीर्षाखाली खर्ची घालण्यात यावा.

अनुदानप्राप्त संस्था व जिल्हा परिषदा यांच्या कर्मचाऱ्यांच्या बाबतीतील खर्च संबंधित प्रमुख लेखाशीर्षाखालील ज्या उप-लेखाशीर्षाखाली त्यांच्या सहाय्यक अनुदानाचा खर्च खर्ची घालण्यात येतो, त्या उप-लेखाशीर्षाखाली खर्ची घालण्यात यावा.

सर्व विभाग प्रमुख, सर्व जिल्हा परिषदांचे मुख्य कार्यकारी अधिकारी आणि कृषि व कृषितर विद्यापीठांचे कुलसचिव यांनी याबाबत होणारा जादा खर्च आठमाही / नऊमाही सुधारित अंदाजपत्रक तयार करताना विचारात घ्यावा."

ह्या आदेशाची इंग्रजी प्रत सोबत जोडली आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

**श. वि. लागवणकर,**
उप सचिव, वित्त विभाग.

प्रति

महालेखापाल-१ (लेखा व अनुज्ञेयता), महाराष्ट्र, मुंबई.
महालेखापाल-२ (लेखा व अनुज्ञेयता), महाराष्ट्र, नागपूर.
महालेखापाल-१ (लेखापरीक्षा), महाराष्ट्र, मुंबई.
महालेखापाल-२ (लेखापरीक्षा), महाराष्ट्र, नागपूर.
अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई.
निवासी लेखापरीक्षा अधिकारी, मुंबई.
सिनियर रिसर्च ऑफिसर, पे रिसर्च युनिट, भारत सरकार, वित्त मंत्रालय (व्यय विभाग) खोली क्र. २६१, नॉर्थ ब्लॉक, नवी दिल्ली.
राज्यपालांचे सचिव.
मुख्य मंत्र्यांचे अपर मुख्य सचिव.
उप मुख्य मंत्र्यांचे सचिव.
सर्व मंत्री आणि राज्यमंत्री यांचे स्वीय सहायक.
मंत्रालयीन सर्व विभाग.
सर्व विभागीय आयुक्त.
मंत्रालयाच्या सर्व विभागांखालील विभाग प्रमुख व कार्यालय प्रमुख.

(शा.म.मु.) एच २२६५ (१८००४—१-९९)

राज्य शासकीय कर्मचारी व इतरांना वाहतूक भत्याची थकबाकी प्रदान करणेबाबत...

महाराष्ट्र शासन
वित्त विभाग
शासन निर्णय, क्रमांक:-वाहभ-१०९९/प्र.क्र.८२/९९/सेवा-५,
मंत्रालय, मुंबई- ४००.०३२.
दिनांक:- ७ सप्टेंबर १९९९

पहा:- १) शासन निर्णय, वित्त विभाग,क्रमांक:-वाहभ-१०९८/प्र.क्र.८३/९८/ सेवा-५, दिनांक १४ डिसेंबर, १९९८.
२) शासन शुध्दीपत्रक, वित्त विभाग, क्रमांक:-वाहभ-१०९८/ प्र.क्र.८३/९८/सेवा-५, दिनांक ६ जानेवारी, १९९९.

## शासन निर्णय

पाचव्या केंद्रीय वेतन आयोगाच्या शिफारशींनुसार केंद्र शासनाच्या धर्तीवर राज्य शासनाने राज्य शासकीय कर्मचारी व इतरांना वर नमूद केलेल्या अनुक्रमांक १ येथील आदेशाअन्वये दिनांक १ ऑक्टोबर, १९९८ पासुन वाहतूक भत्ता नव्याने मंजुर केला आहे.

२. केंद्र शासनाने आपल्या कर्मचा-यांना सदर भत्ता दिनांक १ ऑगस्ट, १९९७ पासुन मंजूर केला आहे. केंद्र शासनाच्या धर्तीवर राज्य शासकीय कर्मचारी व इतरांना वाहतूक भत्ता दिनांक १ ऑगस्ट, १९९७ पासुन मंजूर करण्याबाबतचा प्रश्न काही काळ शासनाच्या विचाराधीन होता.

३. शासन आता असा आदेश देत आहे की, राज्य शासकीय कर्मचारी व इतरांना वाहतूक भत्ता दिनांक १ ऑगस्ट, १९९७ पासुन मंजूर करण्यात यावा.

४. शासन आणखी असेही आदेश देत आहे की, वाहतूक भत्त्याची दिनांक १ ऑगस्ट, १९९७ ते दिनांक ३० सप्टेंबर, १९९८ या कालावधीतील थकबाकी संबंधितांना रोखीने प्रदान न करता ती त्यांच्या भविष्य निर्वाह निधी खात्यामध्ये जमा करण्यात यावी. ज्या कर्मचा-यांच्या बाबतीत भविष्य निर्वाह निधी खाते उघडण्यात आले नसेल अशा कर्मचा-यांच्या बाबतीत त्यांचे खाते उघडण्यात येईल त्यावेळी थकबाकीची रक्कम काढून त्यांच्या खात्यात जमा करण्यात यावी. तसेच थकबाकीच्या भविष्य निर्वाह निधी खात्यामधील उक्त जमा रकमेवर दिनांक ३१ मार्च २००२ पर्यन्तच्या कालावधीकरीता व्याज अनुज्ञेय राहणार नाही.

५. शासन असाही आदेश देत आहे की, भविष्य निर्वाह निधी खात्यामध्ये यापोटी जमा होणा-या रकमेमधुन दिनांक ३१ मार्च, २००२ पर्यन्त कोणत्याही कारणास्तव संबंधितांना उचल किंवा अग्रिम दिले जाऊ नये.मात्र ज्या कर्मचा-यांच्या सेवा या कालावधीमध्ये कोणत्याही कारणास्तव समाप्त झाल्या असतील किंवा जे कर्मचारी निवृत्त झाले असतील किंवा ज्यांचे भविष्य निर्वाह निधी खाते बंद झालेअसेल अशांच्या बाबतीत या संदर्भात देय होणारी रक्कम रोखीने देण्यात यावी.

६. ज्या कर्मचा-यांना अंशदानात्मक भविष्य निर्वाह निधी योजना लागू आहे अशांच्या बाबतीत वाहतूक भत्त्याच्या थकबाकीची रक्कम त्या निधीमध्ये जमा करण्यात यावी. मात्र शासनाकडुन त्याबाबतीत कोणतेही अनुरुप अंशदान दिले जाणार नाही.

७. उक्त थकबाकीची रक्कम, हया भत्यावरील खर्च ज्या शिर्षाखाली खर्ची घालण्यात येतो त्याच शिर्षाखाली खर्ची घालण्यात यावी.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने,

श. वि. लागवणकर,
शासनाचे सह सचिव

(कृ.मा.प.

एच-691(16000+15-9-99)

**अंध,अस्थीव्यंगाने अधू आणि कण्याच्या विकाराने पीडित असणा-या कर्मचा-यांना वाहतूक भत्ता मंजूर करण्याबाबतच्या तरतुदी....**

अद्ययावत आदेश

**महाराष्ट्र शासन**
**वित्त विभाग**

शासन परिपत्रक, क्रमांक : वाहभ-१३००/प्र.क्र.५७/सेवा-५
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.
दिनांक : ४ जून २००१.

पहा : (१) शासन निर्णय, वित्त विभाग, क्रमांक :टीआरए-१३७९/सीआर-१७३७/एसईआर-५, दिनांक: २० फेब्रुवारी, १९८०.
(२) शासन परिपत्रक, वित्त विभाग, क्रमांक : टीआरए-१३८१/सीआर-५४४/एसईआर-५, दिनांक: २९ जून, १९८१.
(३) शासन परिपत्रक,वित्त विभाग, क्रमांक : टीआरए-१३८२/सीआर-९८४/एसईआर-५, दिनांक: २० सप्टेंबर, १९८२.
(४) शासन निर्णय, वित्त विभाग, क्रमांक : टीआरए-१०८३-सीआर-१३७५-एसईआर-५, दिनांक: ४ जानेवारी, १९८४.
(५) शासन परिपत्रक, वित्त विभाग, क्रमांक : टीआरए-१३८३-सीआर-२४५४/एसईआर-५, दिनांक: १० जानेवारी, १९८४.
(६) शासन निर्णय, वित्त विभाग, क्रमांक : विवाभ-१३८८/सीआर-६८०/सेवा-५, दिनांक: ८ मार्च, १९८९.
(७) शासन निर्णय, वित्त विभाग, क्रमांक : विवाभ-१३९०/प्र.क्र.३६१/सेवा-५, दिनांक: २० एप्रिल, १९९०.
(८) शासन निर्णय, वित्त विभाग, क्रमांक : वाहभ-१०९८/प्र.क्र.८३/९८/सेवा-५, दिनांक: १४ डिसेंबर, १९९८.
(९) शासन शुध्दीपत्रक, वित्त विभाग, क्रमांक :वाहभ -१०९८/प्र.क्र.८३/९८/सेवा-५, दिनांक: ६ जानेवारी, १९९९.
(१०) शासन निर्णय, वित्त विभाग, क्रमांक:वाहभ- १०९९/प्र.क्र.८२/९९/सेवा-५, दिनांक: ७ सप्टेंबर, १९९९.

**शासन परिपत्रक**

ज्या अंध किंवा अस्थीव्यंगामुळे अधू किंवा कण्याच्या विकाराने पीडित असलेल्या (कार्यव्ययी कर्मचा-यांसह) नियमित आस्थापनांवरील शासकीय कर्मचा-यांना कामाच्या ठिकाणी जाण्यास अथवा तेथून परत येण्यास सर्वसाधारणपणे शारीरिक मदतीची आवश्यकता असते, त्यांना शासनाने विवक्षित अटींअधिन राहून **विशेष वाहनभत्ता** मंजूर केला होता. हया भत्त्याच्या दरात शासनाने वेळोवेळी सुधारणा केली होती. त्यानंतर शासनाने वरील (८) येथील आदेशान्वये सदर विशेष वाहनभत्ता बंद करुन त्या ऐवजी वर उल्लेखित अपंग कर्मचा-यांना दोन वेगवेगळया दराने **वाहतूकभत्ता** मंजूर करण्याबाबत आदेश निर्गमित केले आहेत. तसेच हे आदेश वरील (१०) येथील आदेशान्वये दि. १ ऑगस्ट, १९९७ पासून पुर्वलक्षी प्रभावाने लागू केले आहेत. अपंग कर्मचा-यांना वरील भत्ता मंजूर करण्याबाबतच्या आदेशातील सध्या अंमलात असलेल्या तरतुदी प्रशासकीय सोयीसाठी एकत्रितरित्या उपलब्ध करुन देण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती. **शासन आता या विषयीच्या**

आदेशांतील अमलात असणा-या तरतुदी खालीलप्रमाणे एकत्रितरित्या उपलब्ध करुन देत आहे. पुढील परिच्छेदात नमूद केलेल्या तरतुदी मागच्या आदेशांमध्ये व [illegible] आहेत, ते त्या तरतुदीसोबत/त्याखाली नमूद केले आहे.

२. (कार्यव्ययी कर्मचा-यांसह) नियमित आस्थापनांवर असलेल्या ज्या अंध किंवा अस्थीव्यंगामुळे अधू किंवा कण्याच्या विकाराने पीडित असलेल्या शासकीय कर्मचा-यांना कामाच्या ठिकाणी जाण्यास अथवा तेथून परत येण्यास सर्वसाधारणपणे शारीरिक मदतीची आवश्यकता असते अशा कर्मचा-यांना, वरील (८) येथील आदेशांत विहित केलेल्या वाहतूकभत्त्याच्या अनुज्ञेयतेबाबतच्या अटींच्या अधीन राहून, त्यातील तक्त्यात नमूद केलेल्या **दराच्या दुप्पट दराने** वाहतूक भत्ता वरील (१०) येथील आदेशान्वये दिनांक १ ऑगस्ट, १९९७ पासून मंजूर करण्यात यावा. सुलभ संदर्भासाठी त्या आदेशांतील वाहतूकभत्त्याचा दरविषयक तक्ता आणि अटी खाली पुन्हा उद्धृत केल्या आहेत.

**तक्ता**

| अनु.क्र. | कर्मचा-याची वेतनश्रेणी | दरमहा वाहतूक भत्त्याचा दर (रु.) "अ-१" आणि "अ" वर्ग शहरे | दरमहा वाहतूक भत्त्याचा दर (रु.) इतर ठिकाणे |
|---|---|---|---|
| १. | रु. ८०००-१३५०० किंवा त्याहून वरच्या वेतनश्रेणीमध्ये वेतन घेणारे कर्मचारी. .. | ८०० | ४०० |
| २. | रु. ६५००-१०५०० किंवा त्याहून वरच्या परंतु रु. ८०००-१३५०० पेक्षा खालच्या वेतनश्रेणीमध्ये वेतन घेणारे कर्मचारी. .. | ४०० | २०० |
| ३. | रु. ६५००-१०५०० पेक्षा खालच्या वेतनश्रेणीमध्ये वेतन घेणारे कर्मचारी. .. | १०० | ७५ |

टीप :- १) वरील तक्त्यात नमूद केलेली "अ-१" आणि "अ" शहरे, स्थानिक पूरक भत्त्याच्या प्रयोजनार्थ केलेल्या शहरांच्या वर्गीकरणाप्रमाणे राहतील.

२) ज्या कर्मचा-यांनी असुधारीत वेतनश्रेणीत वेतन घेण्याचा विकल्प दिलेला आहे अशांच्या बाबतीत त्यांनी जर सुधारित वेतनश्रेणी स्वीकारण्याबाबतचा विकल्प दिला असता तर त्यांना जी सुधारित वेतनश्रेणी देय ठरली असती त्या वेतनश्रेणीच्या अनुषंगाने वाहतूक भत्ता विनियमित करण्यात येईल.

<u>वाहतूकभत्त्याच्या अनुज्ञेयतेबाबतच्या अटी :-</u> १) कर्तव्यस्थानापासून एक किलोमीटर अंतराच्या आत किंवा कर्तव्यस्थान आणि निवासस्थान यांच्या एकत्र परिसरात (Campus) शासकीय निवासस्थान पुरविण्यात आलेल्या कर्मचा-यांना हा भत्ता अनुज्ञेय असणार नाही.

टीप :- वाहतूक भत्त्याचे प्रदान, संबंधित कर्मचा-याने, त्याला पुरविण्यात आलेले शासकीय निवासस्थान, कर्तव्यस्थानापासून एक किलोमीटर अंतराच्या आत किंवा कर्तव्यस्थान आणि निवासस्थान यांच्या एकत्र परिसरात (Campus) नाही अशा आशयाचे प्रमाणपत्र देण्याच्या अधीन राहून करण्यात येईल.

२) ज्या कर्मचा-यांना शासकीय वाहतूक सुविधा (Government Transport) पुरविण्यात आली आहे त्यांना हा भत्ता अनुज्ञेय असणार नाही.

३. मात्र, कर्तव्यस्थानापासून एक किलोमीटर अंतराच्या आत किंवा कर्तव्यस्थान आणि निवासस्थान यांच्या एकत्र परिसरात (Campus) शासकीय निवासस्थान पुरविण्यात आलेल्या अंध/अस्थीव्यंगामुळे अधू/कण्याच्या विकाराने पीडित असलेल्या शासकीय कर्मचा-यांना वरील (८) व (१०) येथील आदेशांन्वये दिनांक १ ऑगस्ट, १९९७ पासून वरील तक्त्यात नमूद केलेल्या दराने वाहतूक भत्ता अनुज्ञेय राहील. मात्र ज्या कर्मचा-यांना शासकीय वाहन पुरविलेले आहे ,त्यांना वाहतूक भत्ता अनुज्ञेय असणार नाही.

४. हया आदेशांच्या प्रयोजनार्थ शासकीय कर्मचा-याच्या बाबतीत किमान शारीरिक अपंगत्वाच्या खालील अटींपैकी किमान एक अट पूर्ण होणे आवश्यक आहे. मुलतः विशेष वाहनभत्त्यासंदर्भात विहीत करण्यात आलेल्या या परिच्छेदातील तरतुदी वरील (८) आणि (१०)येथील आदेशांन्वये दिनांक १ ऑगस्ट,१९९७पासुन वाहतुक भत्त्यासंदर्भातही लागू आहेत.

अ) अस्थीव्यंगामुळे अधू असलेल्या शासकीय कर्मचा-याला वरच्या अथवा खालच्या अवयवाची किमान ४० टक्के कायम स्वरुपाची आंशिक विकलांगता असावी किंवा वरच्या आणि खालच्या अवयवांची मिळून किमान ५० टक्के कायम स्वरुपाची आंशिक विकलांगता असावी. शारीरिक अपंगतेच्या अंदाजासाठी, अमेरिकेतील अस्थीव्यंग शल्यचिकित्सकांसाठी अमेरिकन अकॅडेमी ऑफ आर्थोपेडीक सर्जन्स या संस्थेने कायमची शारिरीक अपंगता शोधून काढण्यासाठी तयार केलेल्या आणि सदर संस्थेच्या वतीने आर्टीफिशल लीम्बस् मॅन्युफॅक्चरिंग कार्पोरेशन ऑफ इंडिया, जी.टी. रोड, कानपूर यांनी प्रकाशित केलेल्या नियमावलीत ग्रंथित केलेल्या मानकांचा अवलंब करण्यात यावा.

टीप :- अस्थीव्यंगामुळे अधू असलेल्या शासकीय कर्मचा-यांना शासकीय रुग्णालयाच्या अस्थीव्यंगोपचार विभागाच्या प्रमुखांची वरील प्रमाणे विकलांगता असल्यांची शिफारस प्राप्त करावी लागेल.

ब) शासकीय कर्मचा-यांची दोन्ही डोळयांची दृष्टी ३/६० पेक्षा कमी असावी अथवा क्षेत्रदृष्टी (फील्डव्हीजन) १० अंशापेक्षा कमी असावी. परंतु केवळ एका डोळयाने अंध असलेले शासकीय कर्मचारी हया आदेशांच्या प्रयोजनार्थ अंध मानण्यात येऊ नयेत.

टीप :- अंध शासकीय कर्मचा-यांना शासकीय रुग्णालयाच्या नेत्रोपचार विभागाच्या प्रमुखांची वरीलप्रमाणे अंधत्व असल्याची शिफारस प्राप्त करावी लागेल.

क) शासकीय कर्मचा-यास पाठीच्या कण्याच्या विकाराने (Spinal deformity-generally known as Hunch back Disability) ४०% पेक्षा अधिक कायमचे आंशिक अपंगत्व आलेले असावे.

टीप :-पाठीच्या कण्याच्या विकाराने पीडित असलेल्या शासकीय कर्मचा-यांना शासकीय रुग्णालयाच्या अस्थिव्यंगोपचार अधिकारी (वर्ग-१) यांची वरीलप्रमाणे अपंगत्व असल्याची शिफारस प्राप्त करावी लागेल.

५. वर उल्लेखित अपंग कर्मचा-यांनी हया आदेशांचा लाभ मिळण्यासाठी त्यांच्या विभागप्रमुखांकडे अर्ज करावेत. अपंगत्वाबाबतची आवश्यक ती शिफारस प्राप्त करण्यासाठी अशा कर्मचा-यांची प्रकरणे विभागप्रमुखांनी योग्य त्या वैदयकिय अधिका-याकडे पाठवावीत. संबंधित वैद्यकिय अधिका-यांनी आपल्या शिफारसपत्रात ज्या तारखेपासून अशा कर्मचा-यास वरील परिच्छेद ४ मध्ये नमूद केल्याप्रमाणे अपंगत्व आल्याचे प्रमाणित केले असेल त्या तारखेपासून किंवा त्याच्या शासकीय सेवेतील नेमणूकीच्या तारखेपासून यातील जी तारीख नंतर असेल तेव्हापासून विभागप्रमुखांनी संबंधित कर्मचा-यास वाहतूकभत्ता मंजूर करावा.

६. ज्या प्रकरणी उक्त अपंग कर्मचा-यांना संबंधित विभागप्रमुखांकडून वाहतुकभत्ता मंजूर करण्यासाठी वैद्यकिय शिफारस मिळविण्याकरीता त्यांच्या मुख्यालयाच्या बाहेरील ठिकाणी असलेल्या शासकीय रुग्णालयात पाठविण्यात आले असेल अशा प्रकरणी त्यांना ते दौ-यावर असल्याचे मानून प्रवासभत्ता व दैनिकभत्ता मंजूर करण्यात यावा, व हया कामासाठीचा त्यांचा अनुपस्थितीचा कालावधी हा कर्तव्य कालावधी समजण्यात यावा.

मात्र जे कर्मचारी आवश्यक ते शिफारसपत्र मिळविण्यास पात्र ठरलेले नाहीत म्हणजेच ज्यांच्या बाबतीत हया आदेशांच्या प्रयोजनार्थ आवश्यक तेवढे अपंगत्व नाही अशा कर्मचा-यांना वरील सवलत मिळणार नाही.

*(मुलतः विशेष वाहनभत्त्यासंदर्भात विहीत करण्यात आलेल्या वरील परिच्छेद (५) आणि (६) मधील कार्यपद्धती/ तरतुदी वरील (८) आणि (१०)येथील आदेशांन्वये दिनांक १ ऑगस्ट,१९९७पासुन वाहतुक भत्त्यासंदर्भातही लागू आहेत.)*

७. सदर वाहतूकभत्ता हा रजा, प्रशिक्षण, दौरा इत्यादी कारणांमुळे ३० दिवसांपेक्षा जास्त अनुपस्थितीच्या कालावधीसाठी अनुज्ञेय असणार नाही.

*(वरील (८) व (१०) येथील आदेशान्वये दिनांक १ ऑगस्ट, १९९७ पासून अंमलात)*

८. सर्व अनुदान प्राप्त शैक्षणिक संस्थाच्या प्राथमिक माध्यमिक शाळांतील पुर्णकालीक शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी तसेच कृषि व कृषितर विद्यापीठातील व तत्संलग्न महाविद्यालयातील शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी त्याचप्रमाणे शासन निर्णय, वित्त विभाग, क्रमांक: मभवा-११८६/३९४/सेवा-१०, दिनांक १८ ऑगस्ट,१९८६ मधील परिच्छेद ६ मध्ये उल्लेखिलेले इतर कर्मचारी यांना सहरहू आदेश लागू असतील.

९. महाराष्ट्र जिल्हा परिषदा व पंचायत समित्या अधिनियम,१९६१(सन १९६२ चा अधिनियम क्रमांक ५) च्या कलम २४८ च्या परंतुकान्वये प्रदान केलेले अधिकार व त्या संबंधातील इतर सर्व अधिकार यांचा वापर करुन शासन असाही आदेश देत आहे की, जिल्हा परीषदांच्या पूर्णकालीक कर्मचा-यांनासुध्दा हे आदेश योग्य त्या फेरफारासह लागू करण्यात यावेत.

१०. विद्यापीठ अनुदान आयोगाच्या वेतनमानानुसार वेतन घेणा-या शिक्षक कर्मचा-यांनाही हे आदेश लागू करण्यात यावेत.

११. संबंधित विभागीय प्रमुखांनी सदरहू आदेश स्थानिक संस्थांच्या आणि सर्व संबंधित संस्थांच्या व्यवस्थापनांच्या निदर्शनास आणून द्यावेत. शासनाने वेळोवेळी मंजूर केलेल्या सहायक अनुदान नियमानुसार हया भत्यासाठी सहाय्यक अनुदान अनुज्ञेय होईल असे त्यांनी व्यवस्थापनांना कळवावे.

१२. शासकीय कर्मचा-यांच्या बाबतीत या आदेशाच्या परिणामी होणारा वाहतूक भत्त्यावरील खर्च हा त्यांचे वेतन व भत्ते यासंबंधीचा खर्च ज्या संबंधित लेखाशिर्षाखाली खर्ची घालण्यात येतो, त्याच लेखा शिर्षाखाली खर्ची घालण्यात यावा.

अनुदान प्राप्त संस्था व जिल्हापरिषदा यांच्या कर्मचाऱ्यांच्या बाबतीतील खर्च संबंधित प्रमुख लेखाशिर्षाखालील ज्या उप-लेखाशिर्षाखाली त्यांच्या सहायक अनुदानाच्या खर्च खर्ची घालण्यात येतो, त्या उप-लेखाशिर्षाखाली खर्ची घालण्यात यावा.

*(वरील परिच्छेद ८ ते १२ मधील तरतूदी वरील (८), (९) व (१०) येथील आदेशांनुसार दिनांक १ ऑगस्ट, १९९७ पासून अंमलात)*

**१३. या परिपत्रकान्वये निर्गमित करण्यात येत असलेल्या सूचना म्हणजे या विषयी पूर्वीच देण्यात आलेल्या आदेशांतील तरतूदींपैकी सध्या अंमलात असणा-या तरतूदींचे केवळ माहितीसाठी केलेले एकत्रिकरण आहे. या परिपत्रकान्वये कोणतेही नवे आदेश देण्यात आलेले नाहीत. मात्र, प्रकरणे सादर करतांना या परिपत्रकाचा संदर्भ देण्यास हरकत नाही. विशेष वाहनभत्ता/वाहतूक भत्याच्या संदर्भातील यापूर्वीची प्रकरणे त्या-त्या कालावधीत लागू असणा-या आदेशांतील तरतूदीनुसार विनियमित करावीत.**

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

**ज.वि.लागवणकर**
शासनाचे सहसचिव

एच-273(सी)(12000+50-6-01)2अ

प्रति,

महालेखापाल-१ (लेखा व अनुज्ञेयता) महाराष्ट्र, मुंबई.
महालेखापाल-२ (लेखा व अनुज्ञेयता) महाराष्ट्र, नागपूर
महालेखापाल-१ (लेखापरीक्षा), महाराष्ट्र, मुंबई,
महालेखापाल-२ (लेखापरीक्षा), महाराष्ट्र, नागपूर,
अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई,
निवासी लेखापरीक्षा अधिकारी, मुंबई,
राज्यपालांचे सचिव,
मुख्यमंत्र्यांचे अपर मुख्य सचिव,
उपमुख्यमंत्र्यांचे सचिव,
सर्व मंत्री आणि राज्यमंत्री यांचे स्वीय सहाय्यक,
मंत्रालयीन सर्व विभाग,
सर्व विभागीय आयुक्त,
मंत्रालयाच्या सर्व विभागाखालील विभाग प्रमुख व कार्यालय प्रमुख,
* प्रबंधक उच्च न्यायालय (मूळ शाखा), मुंबई,
* प्रबंधक उच्च न्यायालय (अपिल शाखा), मुंबई,
* सचिव, महाराष्ट्र लोकसेवा आयोग, मुंबई,
* सचिव, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, मुंबई,
* प्रबंधक, लोकआयुक्त व उपलोकआयुक्त यांचे कार्यालय, मुंबई,
* महासंचालक, ऑल इंडिया इन्स्टिटयूट ऑफ लोकल सेल्फ गव्हर्नमेंट, मुंबई,
शालेय शिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई (२० प्रती),
ग्रामविकास व जलसंधारण विभाग, मंत्रालय, मुंबई (२० प्रती)
नगरविकास विभाग, युडी-१०, मंत्रालय, मुंबई (२० प्रती),
कृषि व पशुसंवर्धन दुग्धव्यवसाय विकास मत्स्यव्यवसाय विभाग (२० प्रती)
आदिवासी विकास विभाग (२० प्रती)
संचालक, लेखा व कोषागारे, मुंबई,
मुख्य लेखापरिक्षक, स्थानिक निधी हिशेब, मुंबई,
संचालक, आदिवासी संशोधन व शिक्षण संस्था, महाराष्ट्र राज्य, पुणे,
आदिवासी विकास आयुक्त, नाशिक,
सर्व विभागातील समाजकल्याण अधिकारी,
अपर आयुक्त, आदिवासी उपयोजना, नाशिक / नागपूर,
सर्व समाजकल्याण अधिकारी, वर्ग-१,
सर्व आदिवासी कल्याण अधिकारी,
सर्व प्रकल्पाधिकारी, एकात्मिकृत आदिवासी विकास प्रकल्प,
कुलसचिव, महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहुरी, जि.अहमदनगर,
कुलसचिव, मराठवाडा कृषि विद्यापीठ, परभणी,
कुलसचिव, पंजाबराव कृषि विद्यापीठ, अकोला,
कुलसचिव, कोकण कृषि विद्यापीठ, दापोली, जि.रत्नागिरी,
कुलसचिव, मुंबई विद्यापीठ, मुंबई,
कुलसचिव, पुणे विद्यापीठ, पुणे,
कुलसचिव, नागपूर विद्यापीठ, नागपूर,
उपमुख्य लेखापरिक्षक, स्थानिक निधी हिशेब, मुंबई/पुणे/नागपूर औरंगाबाद/नाशिक/अमरावती,
जिल्हा लेखापरीक्षा अधिकारी, स्थानिक निधी हिशेब, महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहुरी, जि.अहमदनगर,
जिल्हा लेखापरीक्षा अधिकारी, स्थानिक निधी हिशेब, कोकण कृषि विद्यापीठ, दापोली, जि.रत्नागिरी,
जनसंपर्क अधिकारी, मंत्रालय, मुंबई,
सर्व जिल्हा परिषदांचे मुख्य कार्यकारी अधिकारी,
सर्व जिल्हा परिषदांचे मुख्य लेखा व वित्त अधिकारी,
शिक्षण संचालक, महाराष्ट्र राज्य, पुणे (२५ प्रती),
उच्च शिक्षण संचालक, महाराष्ट्र राज्य, पुणे (२५ प्रती)
कला संचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई (४० प्रती)
संचालक, तंत्रशिक्षण, महाराष्ट्र राज्य, मुंबई (१०० प्रती),
संचालक, तांत्रिक शिक्षण द्वारा - तंत्रशिक्षण संचालक, मुंबई (२५० प्रती)
सिनियर रिसर्च ऑफीसर, पे रिसर्च युनिट, भारत सरकार वित्त मंत्रालय (व्यय विभाग) खोली क्र.२६१,नॉर्थ ब्लॉक, नवी दिल्ली,
सर्व विभागीय शिक्षण उपसंचालक, (प्रत्येकी १० प्रती)
सर्व विभागीय तंत्रशिक्षण उपसंचालक (प्रत्येकी १० प्रती)
सर्व जिल्हा परिषदांचे शिक्षणाधिकारी .
आयुक्त, महानगरपालिका, नागपूर,
प्रशासकीय अधिकारी, पश्चिम महाराष्ट्रातील नगरपालिका, शिक्षण मंडळे (पुणे/कोल्हापूर/सोलापूर या महानगरपालिकांची शिक्षण मंडळे यासह)
मुख्य अधिकारी, सर्व नगरपालिका
कार्यकारी अधिकारी, कॅन्टोनमेंट बोर्ड, खडकी/देहू रोड/ देवळाली/ अहमदनगर..
सर्व जिल्हा कोषागार अधिकारी
संचालक, आदिवासी कल्याण, महाराष्ट्र राज्य, नाशिक (१० प्रती)
संचालक, समाजकल्याण, महाराष्ट्र राज्य, पुणे (१० प्रती)
कुलसचिव, डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद
कुलसचिव, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर,
कुलसचिव, अमरावती विद्यापीठ, अमरावती,
कुलसचिव, श्रीमती नाथीबाई दामोदर ठाकरसी महिला विद्यापीठ, मुंबई,
कुलसचिव, उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगांव,
अधिक्षक, वेतनपथक, सर्व जिल्हे,
शिक्षण निरिक्षक, बृहन्मुंबई (उत्तर, दक्षिण व पश्चिम विभाग),
सर्व कन्याशाळा निरिक्षिका,
सर्व जिल्ह्याचे वरिष्ठ लेखापरिक्षक, (शिक्षण विभाग८,
शिक्षण अधिकारी, बृहन्मुंबई महानगरपालिका,
संचालक, नगरपालिका प्रशासन, मुंबई,
सर्व प्रादेशिक संचालक नगरपालिका प्रशासन,
वित्त विभागातील सर्व कार्यासने,
निवड फाईल, वित्त विभाग, सेवा-५.

* पत्राद्वारे

**राज्य शासकीय कर्मचा-यांना व इतरांना**
**वाहतूक भत्ता मंजूर करण्याबाबत........**
**स्पष्टीकरण**

**महाराष्ट्र शासन**
**वित्त विभाग**

**शासन परिपत्रक क्रमांक : वाहभ- १०९९/प्र.क्र.४५/सेवा-५,**
**मंत्रालय, मुंबई ४०० ०३२. दिनांक ९ मे, २००३.**

पहा : (१) शासन निर्णय, वित्त विभाग, क्रमांक संकीर्ण-१०९४/प्र.क्र.४१/सेवा-५, दिनांक २१ ऑक्टोबर, १९९४.
(२) शासन परिपत्रक, वित्त विभाग, क्रमांक संकीर्ण-१०९४/प्र.क्र.४१/सेवा-५, दिनांक २८ ऑक्टोबर, १९९४.
(३) शासन निर्णय, वित्त विभाग, क्रमांक वाहभ-१०९८/प्र.क्र.८३/९८/सेवा-५, दिनांक १४ डिसेंबर, १९९८.
(४) शासन निर्णय, वित्त विभाग, क्रमांक वाहभ-१०९९/प्र.क्र.८२/९९/सेवा-५, दिनांक ७ सप्टेंबर, १९९९.

**परिपत्रक**

वरील (३) व (४) येथील आदेशांन्वये राज्य शासकीय कर्मचा-यांना व इतरांना दिनांक १ ऑगस्ट, १९९७ पासून निवासस्थानापासून कर्तव्य-स्थानापर्यंतच्या प्रवासावरील खर्चाची भरपाई म्हणून वाहतूक भत्ता (Transport Allowance) मंजूर करण्यात आला आहे. सदर वाहतूक भत्त्याच्या अनुज्ञेयतेबाबत काही मुद्दे उपस्थित करण्यात आले आहेत. त्या संदर्भात शासन आता खालीलप्रमाणे खुलासा करीत आहे :—

| मुद्दे | स्पष्टीकरण |
|---|---|
| (१) कर्तव्यस्थानापासून एक किलोमीटर अंतराच्या आत खाजगी निवासस्थानात राहणा-या कर्मचा-यांनाही वाहतूक भत्ता अनुज्ञेय आहे किंवा कसे ? | अनुज्ञेय आहे. |
| (२) कर्तव्यस्थान आणि निवासस्थान यांच्या एकत्र परिसरात (Campus) शासकीय निवासस्थान पुरविण्यात आलेल्या कर्मचा-यास वाहतूक भत्ता अनुज्ञेय आहे किंवा कसे ? | कर्तव्यस्थान आणि निवासस्थान यांच्या एकत्र परीसरात (Campus) शासकीय निवासस्थान पुरविण्यात आलेल्या कर्मचाऱ्यास कर्मचाऱ्याचे निवासस्थान आणि कर्तव्यस्थान यातील अंतर १ किलोमीटर व त्यापेक्षा जास्त असले तरीही वाहतूक भत्ता अनुज्ञेय नाही. |
| (३) वाहतूक भत्त्याची परिगणना करण्यासाठी, अनुपस्थितीचा कालावधी मोजताना अशा कालावधीच्या पुढे व मागे जोडून येणा-या सुट्या त्या कालावधीत समाविष्ट कराव्यात किंवा कसे ? | अनुपस्थितीचा कालावधी मोजताना अशा कालावधीला जोडून येणारे पुढील व मागील सुटीचे शनिवार, रविवार आणि सार्वजनिक व विशेष सुट्या वगळण्यात याव्यात. |
| (४) अनुपस्थितीचा कालावधी वेगवेगळ्या कॅलेंडर महिन्यातील असल्यास वाहतूक भत्त्याचे विनियमन कसे करावे ? | अनुपस्थितीचा कालावधी मोजतांना कॅलेंडर महिने स्वतंत्रपणे विचारात न घेता, तो सलगपणे विचारात घ्यावा.<br>उदा. एखादा कर्मचारी एखाद्या वर्षी १५ जुलै ते २० ऑगस्ट या कालावधीसाठी अनुपस्थित असेल तर या आदेशांच्या प्रयोजनार्थ त्याच्या अनुपस्थितीचा कालावधी (पुढे मागे जोडून येणारे सुटीचे दिवस वगळून) ३७ दिवस इतका असेल. ह्या ३७ दिवसांच्या अनुपस्थितीच्या कालावधीसाठी त्याला वाहतूक भत्ता मिळणार नाही. मात्र जुलै आणि ऑगस्ट या महिन्यातील उर्वरित कालावधीसाठी त्याला यथाप्रमाण (in proportion) वाहतुक भत्ता अनुज्ञेय असेल. |
| (५) (i) दीर्घ सुटी अनुज्ञेय असलेल्या कर्मचाऱ्यांना दीर्घ सुटीच्या कालावधीत वाहतूक भत्ता अनुज्ञेय आहे किंवा कसे ? | दीर्घ सुटीचा कालावधी कमाल ३० दिवस इतका असेल तर, अन्य अटींच्या अधीन राहून, वाहतूक भत्ता अनुज्ञेय ठरेल.<br>मात्र, दीर्घ सुटीचा कालावधी ३० दिवसांपेक्षा जास्त असेल तर वाहतूक भत्ता अनुज्ञेय असणार नाही. |

**(ii)** दीर्घ सुटी अनुज्ञेय असलेल्या कर्मचाऱ्यांना दीर्घ सुटीच्या कालावधीत मुख्यालयाच्या हद्दीत वा त्याबाहेर प्रशिक्षणासाठी पाठविण्यात आल्यास त्यांना वाहतूक भत्ता अनुज्ञेय आहे किंवा कसे ?

दीर्घ सुटीच्या कालावधीत प्रशिक्षणासाठी वा इतर शैक्षणिक किंवा प्रशासकीय कर्तव्य पार पाडण्यासाठी मुख्यालयाच्या हद्दीत वा त्याबाहेर कर्मचाऱ्यास पाठविण्यात आल्यास त्याची दीर्घसुटी खंडीत झाल्याचे समजण्यात यावे आणि त्यांना जर दैनिक भत्ता, मोफत वाहन सुविधा वा कोणत्याही प्रकारच्या वाहनभत्त्याचा लाभ या प्रयोजनार्थ मिळत नसेल तर, वाहतूक भत्ता अनुज्ञेय ठरेल. मात्र प्रशिक्षण वा शैक्षणिक कार्य पार पाडण्यासाठी व्यतित केलेला संपूर्ण कालावधी हा कर्तव्य कालावधी म्हणून नियमित केला नसेल तर या कालावधीत वाहतूक भत्ता अनुज्ञेय ठरणार नाही.

**(६) (i)** निलंबन कालावधीत वाहतूक भत्ता अनुज्ञेय आहे किंवा कसे ?

निलंबन कालावधीत वाहतूक भत्ता अनुज्ञेय नाही.

**(ii)** निलंबन कालावधी हा नंतरच्या आदेशान्वये कर्तव्य कालावधी म्हणून विनियमित करण्यात आला असेल तर त्या कालावधीसाठी वाहतूक भत्ता अनुज्ञेय ठरतो किंवा कसे ?

निलंबन कालावधी कालांतराने कर्तव्य कालावधी म्हणून नियमित झाला तरी त्या कालावधीसाठी वाहतूक भत्ता अनुज्ञेय राहणार नाही.

**(७)** कर्तव्य म्हणून मानल्या गेलेल्या प्रशिक्षण कालावधीत कर्मचा-यांना वाहतूक भत्ता अनुज्ञेय आहे किंवा कसे ?

अशा प्रकरणी जर संबंधित कर्मचा-याच्या शासकीय निवासस्थानापासून प्रशिक्षणाचे ठिकाण (असे ठिकाण मुख्यालय हद्दीतील वा त्याबाहेरील असू शकेल) १ किलोमीटरपेक्षा जास्त अंतरावर असेल *(किंवा तो वास्तव्य करीत असलेल्या खाजगी निवासस्थानापासून प्रशिक्षणाचे ठिकाण १ किलोमीटरपेक्षा कमी वा जास्त अंतरावर असेल)* आणि त्यास या प्रशिक्षणाला उपस्थित राहण्यासाठी कोणतीही वाहन सुविधा / प्रवासभत्ता /दैनिक भत्ता देण्यात आला नसेल तर प्रशिक्षणाचा कालावधी कितीही दिवसांचा असला तरी, वाहतूक भत्ता अनुज्ञेय ठरेल.

मात्र प्रशिक्षणासाठी **दौ-यावर** असणा-या कर्मचा-यास, जर त्याची अनुपस्थिती ३० दिवसांपेक्षा जास्त असेल तर त्याला वाहतूक भत्ता अनुज्ञेय होणार नाही.

**(८) (i)** निरीक्षणाच्या कामासाठी जाणा-या निरीक्षण पथकाच्या सदस्यांना वाहतूक भत्ता अनुज्ञेय आहे किंवा कसे ?

**(ii)** क्षेत्रीय कामासाठी सतत (Continuously) फिरती करावी लागणा-या कर्मचा-यांना वाहतूक भत्ता अनुज्ञेय आहे किंवा कसे ?

वाहतूक भत्ता हा कर्मचा-याला त्याच्या निवासस्थानापासून ते कर्तव्यस्थानापर्यंतच्या व परतीच्या प्रवासावरील खर्च भागविण्यासाठी दिला जातो. जर कर्मचा-यास निवासस्थान ते निरीक्षणाचे स्थान / क्षेत्रीय कामाचे स्थान व परत अशा ३० दिवसांपेक्षा जास्त कालावधीतील निरीक्षण / फिरतीनिमित्तच्या प्रवासासाठी प्रवासभत्ता / दैनिक भत्ता वा मोफत वाहन सुविधेचा लाभ मिळत असेल वा कोणत्याही प्रकारचा वाहन भत्ता मिळत असेल तर कर्मचा-यास वाहतूक भत्ता मिळणार नाही.

**(९)** एखाद्या ठिकाणची विशेष परिस्थिती लक्षात घेऊन, निवास-स्थानाचे ठिकाण ते कार्यालय व परत या प्रवासावरील खर्चाची भरपाई म्हणून विशेष रोख भत्ता / विशेष रक्कम इत्यादी मंजूर करण्यात आली असेल तर त्या ठिकाणी काम करणाऱ्या कर्मचाऱ्यांना वाहतूक भत्ता देय होईल किंवा कसे ?

वाहतूक भत्ता कर्मचाऱ्याला त्याच्या निवासस्थानापासून ते कर्तव्यस्थानापर्यंतच्या प्रवासावरील खर्चाची भरपाई म्हणून दिला जातो. त्याच प्रयोजनासाठी अन्य नांवाने प्रवास खर्चाची भरपाई मंजूर करण्यात आली असेल तर एकाच वेळेस वाहतूक भत्ता आणि अन्य नांवाने भरपाई मंजूर करता येणार नाही. अशा प्रकरणी कोणताही एक पर्याय निवडण्याचा विकल्प देण्यात यावा.

२. वाहतूक भत्त्याच्या अनुज्ञेयतेसंदर्भातील तरतूदींचा, वर नमूद केलेल्या स्पष्टीकरणापेक्षा वेगळा अर्थ लावला गेल्याने या भत्त्याचे अतिप्रदान झाले असेल तर अशी अतिप्रदानाची रक्कम **कमाल १२ समान हप्त्यांमध्ये** वसूल करण्यात यावी.

३. सिंधुदुर्ग जिल्ह्याचे मुख्यालय 'कुडाळ' या ठिकाणाहून 'ओरोस' या ठिकाणी हलविण्याबाबतचा निर्णय घेतल्यावर 'ओरोस' या नव्या मुख्यालयी स्थानांतरीत केल्या जाणा-या कार्यालयात काम करणा-या कर्मचा-यांना त्यांचे मुख्यालयाचे जुने ठिकाण ते ओरोस येथील प्रशासकीय इमारत या दरम्यान कराव्या लागणा-या प्रवासासाठी, संदर्भाधीन (१) आणि (२) येथील आदेशांन्वये, दरमहा रु.२४०/- या दराने विहीत अटींच्या अधीन राहून विशेष रोखभत्ता मंजूर करण्यात आला आहे. आता संदर्भाधीन (३) आणि (४) येथील आदेशान्वये, सर्व राज्य शासकीय कर्मचारी व इतरांना विहीत अटींच्या अधीन राहून दिनांक १ ऑगस्ट, १९९७ पासून वाहतूक भत्ता मंजूर करण्यात आला असल्याने, विशेष रोख भत्त्याच्या अनुज्ञेयतेबाबत पुढीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत :—

**(अ)** ओरोस येथे कार्यरत असणा-या आणि विशेष रोख भत्ता व वाहतूक भत्ता अशा दोनही भत्त्यांचा लाभ घेणा-या कर्मचा-यांना या दोनपैकी एकच भत्ता अनुज्ञेय ठरविण्यात यावा. विशेष रोख भत्ता व वाहतूक भत्ता या दोनपैकी कोणताही एक भत्ता स्विकारण्याचा विकल्प कर्मचा-यांकडून घेण्यात यावा.

**(ब)** सध्या सेवेत असणारे जे कर्मचारी वाहतूक भत्ता स्विकारण्याचा विकल्प देतील, त्या कर्मचा-यांना दिनांक १ ऑगस्ट, १९९७ पासून देण्यात आलेल्या विशेष रोख भत्त्याची **कमाल ३६ समान मासिक हप्त्यात** वसूली करण्यात यावी.

**(क)** जे कर्मचारी विशेष रोख भत्ता स्विकारण्याचा विकल्प देतील, त्या कर्मचा-यांच्या भविष्य निर्वाह निधीमध्ये ऑगस्ट १९९७ ते सप्टेंबर १९९८ च्या कालावधीसाठी वाहतूक भत्त्याची थकबाकी जमा करण्याबाबतचे आदेश रद्दबातल समजण्यात यावेत. हे आदेश रद्द करण्यात आल्याने अशा जमा करण्यात आलेल्या रकमेवर मिळणारे व्याजही संबंधितांना मिळणार नाही.

**अशा कर्मचा-यांना ऑक्टोबर १९९८ पासून अदा करण्यात आलेल्या वाहतूक भत्त्याची कमाल ३६ मासिक हप्त्यांमध्ये वसुली करण्यात यावी.**

४. वरील परिच्छेद २ व ३ मध्ये देण्यात आलेल्या आदेशांच्या परिणामी उद्‌भवणाऱ्या वाहतूक भत्त्याच्या रकमेची वसुली माहे मे, २००३ या महिन्याच्या वेतनापासून सुरु करण्यात यावी.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

**शु. श. कारेकर,**
शासनाचे उप सचिव.

प्रति,

महालेखापाल-१ (लेखा व अनुज्ञेयता), महाराष्ट्र, मुंबई
महालेखापाल-२(लेखा व अनुज्ञेयता), महाराष्ट्र, नागपूर
महालेखापाल-१(लेखापरीक्षा), महाराष्ट्र, मुंबई
महालेखापाल-२(लेखापरीक्षा), महाराष्ट्र, नागपूर
अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई
निवासी लेखापरीक्षा अधिकारी, मुंबई
राज्यपालांचे सचिव
मुख्य मंत्र्यांचे प्रधान सचिव
उप मुख्यमंत्र्यांचे सचिव
सर्व मंत्री आणि राज्यमंत्री यांचे स्वीय सहायक
मंत्रालयीन सर्व विभाग
सर्व विभागीय आयुक्त
मंत्रालयाच्या सर्व विभागांखालील विभाग प्रमुख व कार्यालय प्रमुख
* प्रबंधक, उच्च न्यायालय (मूळ शाखा), मुंबई
* प्रबंधक, उच्च न्यायालय (अपील शाखा), मुंबई
* सचिव, महाराष्ट्र लोकसेवा आयोग, मुंबई
* सचिव, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, मुंबई
* प्रबंधक, लोकआयुक्त व उपलोकआयुक्त यांचे कार्यालय, मुंबई
* सहसंचालक, ऑल इंडिया इन्स्टीटयूट ऑफ लोकल सेल्फ गव्हर्नमेंट, मुंबई
शालेय शिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई (२० प्रती)
ग्रामविकास व जलसंधारण विभाग, मंत्रालय, मुंबई (२० प्रती)
नगरविकास विभाग, यूडी-१०, मंत्रालय, मुंबई (२० प्रती)

कृषि व पशुसंवर्धन,दुग्ध व्यवसाय विकास,मत्स्यव्यवसाय विभाग(२० प्रती)
आदिवासी विकास विभाग (२० प्रती)
संचालक, लेखा व कोषागारे, मुंबई
मुख्य लेखा परीक्षक, स्थानिक निधी हिशेब, मुंबई
सर्व विभागांतील समाजकल्याण अधिकारी
सर्व समाजकल्याण अधिकारी, वर्ग-१
सर्व प्रकल्प अधिकारी, एकात्मिकृत आदिवासी विकास प्रकल्प
कुलसचिव, महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहुरी, जिल्हा अहमदनगर
कुलसचिव, मराठवाडा कृषि विद्यापीठ, परभणी
कुलसचिव, पंजाबराव कृषि विद्यापीठ, अकोला
कुलसचिव, कोकण कृषि विद्यापीठ, दापोली, जिल्हा रत्नागिरी
कुलसचिव, मुंबई विद्यापीठ, मुंबई
कुलसचिव, पुणे विद्यापीठ, पुणे
कुलसचिव, नागपूर विद्यापीठ, नागपूर
कुलसचिव, डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद
कुलसचिव, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
कुलसचिव, अमरावती विद्यापीठ, अमरावती
कुलसचिव, श्रीमती नाथीबाई दामोदर ठाकरसी महिला विद्यापीठ, मुंबई
कुलसचिव, उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगाव
उप मुख्य लेखा परीक्षक, स्थानिक निधी हिशेब,मुंबई/ पुणे/नागपूर/औरंगाबाद/नाशिक/अमरावती
जिल्हा लेखापरीक्षा अधिकारी, स्थानिक निधी हिशेब, महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहुरी, जिल्हा अहमदनगर
जिल्हा लेखापरीक्षा अधिकारी, स्थानिक निधी हिशेब, कोकण कृषि विद्यापीठ, दापोली, जिल्हा रत्नागिरी
जनसंपर्क अधिकारी, मंत्रालय, मुंबई
सर्व जिल्हा परिषदांचे मुख्य कार्यकारी अधिकारी
सर्व जिल्हा परिषदांचे मुख्य लेखा व वित्त अधिकारी
शिक्षण संचालक, महाराष्ट्र राज्य, पुणे (२५ प्रती)
उच्च शिक्षण संचालक, महाराष्ट्र राज्य, पुणे (२५ प्रती)
कला संचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई (४० प्रती)
संचालक, तंत्र शिक्षण, महाराष्ट्र राज्य, मुंबई (१०० प्रती)
संचालक, तांत्रिक प्रशिक्षण, द्वारा- तंत्र शिक्षण संचालक, मुंबई (२५० प्रती)
सिनीयर रिसर्च ऑफिसर, पे रिसर्च युनिट, भारत सरकार, वित्त मंत्रालय
(व्यय विभाग) खोली क्र.२६१, नॉर्थ ब्लॉक, नवी दिल्ली
सर्व विभागीय शिक्षण उप संचालक (प्रत्येकी १० प्रती)
सर्व विभागीय तंत्र शिक्षण उप संचालक (प्रत्येकी १० प्रती)
सर्व जिल्हा परिषदांचे शिक्षणाधिकारी
आयुक्त महानगरपालिका, नागपूर
प्रशासकीय अधिकारी, पश्चिम महाराष्ट्रातील नगरपालिका शिक्षण मंडळे (पुणे/कोल्हापूर/सोलापूर या महानगरपालिकांची शिक्षण मंडळे यांसह)
कार्यकारी अधिकारी, कॅन्टोनमेंट बोर्ड, खडकी/देहू रोड/देवळाली/अहमदनगर
मुख्य अधिकारी, सर्व नगरपालिका
सर्व जिल्हा कोषागार अधिकारी
आदिवासी विकास आयुक्त, नाशिक
संचालक, आदिवासी कल्याण, महाराष्ट्र राज्य, नाशिक (१० प्रती)
संचालक, आदिवासी संशोधन शिक्षण संस्था, महाराष्ट्र राज्य, पुणे
अपर आयुक्त, आदिवासी उपयोजना, नाशिक/नागपूर
सर्व आदिवासी कल्याण अधिकारी
संचालक, समाजकल्याण, महाराष्ट्र राज्य, पुणे (१० प्रती)
अधीक्षक, वेतन पथक, सर्व जिल्हे
शिक्षण निरीक्षक, बृहन्मुंबई (उत्तर, दक्षिण व पश्चिम विभाग)
सर्व कन्याशाळा निरीक्षिका
सर्व जिल्ह्यांचे वरिष्ठ लेखा परीक्षक (शिक्षण विभाग)
शिक्षण अधिकारी, बृहन्मुंबई महानगरपालिका
संचालक, नगरपालिका प्रशासन, मुंबई
सर्व प्रादेशिक संचालक, नगरपालिका प्रशासन
वित्त विभागातील सर्व कार्यासने
निवड नस्ती, वित्त विभाग-सेवा-५

* पत्राद्वारे

**अंध, अस्थीव्यंगाने अधू आणि कण्याच्या विकाराने पीडित असणारे राज्य शासकीय कर्मचारी व इतरांना वाहतूक भत्ता मंजूर करण्याबाबत.**

**महाराष्ट्र शासन**
**वित्त विभाग**
शासन निर्णय क्रमांक: वाहभ-१००३/प्र.क्र.६४/सेवा-५
मंत्रालय, मुंबई- ४०० ०३२.
**दिनांक : २ ऑगस्ट, २००४**

पहा: (१) शासन निर्णय, वित्त विभाग क्रमांक: टीआरए-१३७९/सीआर-१७३७/एसईआर-५, दिनांक २० फेब्रुवारी, १९८०.
(२) शासन निर्णय, वित्त विभाग क्रमांक: टीआरए-१०८३/प्र.क्र.१३७५/एसईआर-५, दिनांक ४ जानेवारी, १९८४.
(३) शासन परिपत्रक, वित्त विभाग क्रमांक:टीआरए-१३८३/सीआर-१४५४/एसईआर-५, दिनांक १० जानेवारी, १९८४.
(४) शासन निर्णय, वित्त विभाग क्रमांक:विवाभ-१३८८/सीआर-६८०/सेवा-५, दिनांक ८ मार्च, १९८९.
(५) शासन निर्णय, वित्त विभाग क्रमांक:विवाभ-१३९०/प्र.क्र.३६१/सेवा-५, दिनांक २० एप्रिल, १९९०.
(६) शासन निर्णय, वित्त विभाग क्रमांक:वाहभ-१०९८/प्र.क्र.८३/९८/सेवा-५, दिनांक १४ डिसेंबर, १९९८.
(७) शासन शुध्दीपत्रक, वित्त विभाग क्रमांक: वाहभ-१०९८/प्र.क्र.८३/९८/सेवा-५, दिनांक ६ जानेवारी, १९९९.
(८) शासन निर्णय, वित्त विभाग क्रमांक: वाहभ-१०९९/प्र.क्र.८२/९९/सेवा-५, दिनांक ७ सप्टेंबर, १९९९.
(९) शासन परिपत्रक, वित्त विभाग क्रमांक:वाहभ-१३००/प्र.क.५७/सेवा-५, दिनांक ४ जून,२००१.
(१०) शासन परिपत्रक, वित्त विभाग क्रमांक:वाहभ-१०९९/प्र.क.४५/सेवा-५, दिनांक ९ मे, २००३.

## शासन निर्णय

अंध, हातापायाच्या विकलांगतेसहित अस्थीव्यंगामुळे अधू किंवा कण्याच्या विकाराने पीडीत असलेले राज्य शासकीय कायम आस्थापनेवरील (कार्यव्ययी आस्थापनेसह) कर्मचारी व इतरांना उपरोल्लिखित अ.क्र.६ येथील आदेशानुसार विशेष वाहनभत्ता बंद करुन त्याऐवजी त्यात विहीत केलेल्या अटींच्या अधीन राहून, सर्वसाधारण कर्मचा-यांसाठी विहित करण्यात आलेल्या दराच्या दुप्पट दराने वाहतूक भत्ता मंजूर करण्यात आला आहे. मात्र, कर्तव्यस्थानापासून एक किलोमिटर अंतराच्या आत किंवा कर्तव्यस्थान व निवासस्थान यांचा एकच परिसर असेल अशा ठिकाणी राहणा-या कर्मचा-यांना हा भत्ता सर्वसाधारण कर्मचा-यांसाठी लागू असणा-या दरानेच मंजूर करण्यात आला आहे.

रोटा प्रिंट/एच–564(8000+30–8–04)1

